संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 9 | Marathi Monthly | Thane, 1 March 2026 to 31 March 2026 | Pages 16 | Price : 10/-

# रोह्यातील 'डीआरटी अँथिया' कंपनीतील कामगारांना, १४ हजार रुपयांची (CTC वगळून) थेट भरघोस पगारवाढ !

## 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष राजन राजे यांचा, रायगड जिल्ह्यात औद्योगिक चमत्कार...



**रोहा/धाटाव (रायगड) :** 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' या युनियनचा रायगड जिल्ह्यात झंझावात सुरु झाला असून, रोहा तालुक्यातील धाटाव एमआयडीसी या औद्योगिकक्षेत्रात असलेल्या, 'डीआरटी अँथिया अरोमा केमिकल्स प्रा. लि.' या कंपनीतील सुमारे १०५ कायम कामगार सभासदांना तब्बल १४ हजार रुपयांची थेट पगारवाढ (CTC वगळून) मिळाली आहे. 'धर्मराज्य'चे अध्यक्ष आणि महाराष्ट्राच्या औद्योगिकक्षेत्रातील ज्वलंत कामगार-नेते मा. राजन राजे यांच्या नेतृत्वाखाली; तसेच, त्यांच्या कामगारक्षेत्रातील चळवळीला साजेशी ही भरघोस पगारवाढ झाल्याने, रायगड जिल्ह्यात अभिमानास्पद असा औद्योगिक चमत्कार घडला आहे. सोमवार, दि. २ फेब्रुवारी-२०२६ रोजी, ठाणे शहरातील टिपटॉप प्लाझा येथे संपन्न झालेल्या, पगारवाढीच्या या पहिल्यावहिल्या त्रैवार्षिक कराराप्रसंगी, व्यवस्थापनाच्या वतीने एचआर प्रमुख श्री. लतेश मिरकर, प्रोडक्शन मॅनेजर श्री. आशिष दगडे, व्यवस्थापनाचे वकील ड. मोहित कपूर; तर, युनियनच्या वतीने उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर, महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, सचिव श्री. समीर चव्हाण, युनिट अध्यक्ष श्री. प्रदीप जंगम, उपाध्यक्ष श्री. निखिल वरणकर, सेक्रेटरी श्री. मयुर कोंडे, कार्यकारिणी सदस्य श्री. विनोद मगर आणि श्री. रामदास साखीळकर आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. पगारवाढीच्या या करारात, कामगारांना ६० टक्के डीए बेसिकमध्ये आणि ४० टक्के अलाऊन्समध्ये वाढ मिळाली आहे. त्यामुळे याआधी ३० ते ३५ हजार पगार घेणारे कामगार आता, दरमहा ४५ ते ५० हजार पगार घेणार आहेत. त्याचबरोबर, नव्याने भरती होऊन कायम होणाऱ्या कामगाराला, २२ हजार रुपयांपासून पगाराची सुरुवात होणार आहे, जो आधी एंट्री लेव्हलच्या कामगाराला १३ ते १४ हजार रुपये इतकाच तुटपुंजा पगार मिळत होता, त्यातदेखील या कराराअंतर्गत समाधानकारक वाढ करण्यात आली आहे. दरम्यान, 'डीआरटी अँथिया' या बहुराष्ट्रीय रासायनिक कंपनीतील कामगारांना, व्यवस्थापनाने गेल्या अनेक वर्षांपासून अतिशय कमी वेतनमानावर झुलवत ठेवले होते. मात्र, मा. राजन राजे यांच्या अध्यक्षीय नेतृत्वाखालील 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सभासदत्व स्विकारल्यानंतर, कामगारांना सन्मानजनक वेतन व त्यांचे हक्क मिळावेत यासाठी, युनियनकडून कंपनी व्यवस्थापनासोबत बोलणी सुरु करण्यात आली. परंतु, व्यवस्थापन सकारात्मक प्रतिसाद देत नसल्याचे लक्षात ...पृष्ठ क्र. ३ वर

**कामगारांना ६० टक्के डीए बेसिकमध्ये आणि ४० टक्के अलाऊन्समध्ये वाढ मिळाली आहे. त्यामुळे याआधी ३० ते ३५ हजार पगार घेणारे कामगार आता, दरमहा ४५ ते ५० हजार पगार घेणार आहेत.**


अंतरंग



भाजप-संघीयांनी सगळी भारतीय-व्यवस्थाचं आपली 'चपराशी' बनवून टाकलीय...
...राजन राजे
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
पृष्ठ क्र. ४

शिवराय-गांधीजी-आंबेडकर यांचा एकमेकांशी काय संबंध?
...ज्ञानेश महाराव
पृष्ठ क्र. ५



पप्पूपासून पोलादी नेता : राहुल गांधींचा उदय आणि सत्तेला दिलेले थेट आव्हान
पृष्ठ क्र. ७

ग्रामसीचे 'हेजीमनी' तत्त्व आणि हिंदुत्व
...जगदीश काबरे
पृष्ठ क्र. १०

# चार काळे कामगार कायदे लादून, श्रमिकवर्गाला उध्वस्त करण्याचा, केंद्र सरकारचा कुटील डाव!

## 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांचा मोदी-शहांवर जोरदार घणाघात...

**ठाणे (प्रतिनिधी) : ''आयोध्येत राम मंदिर बांधणारे; पण, कामगार-चळवळीला स्मशानभूमी दाखवणारे मोदी-शहा सरकार हे, श्रमिकांच्या विरोधात असून, कामगारांच्या जीवावर आणि त्यांच्या रक्ताघामाच्या लुटीवर, मस्तवाल झालेल्या धनदांडग्या-भांडवलदारी मालकशाहीचे तारणहार असलेल्या भारतीय जनता पक्षाला रान मोकळं सोडू नका... यातून केंद्र सरकारचा, श्रमिकवर्गाला उध्वस्त करण्याचा कुटील डाव आखला गेलाय!'' असा जोरदार घणाघात 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार-नेते राजन राजे यांनी, ठाण्यात केला. केंद्र सरकारने लागू केलेल्या चार काळ्या कामगार कायद्यांचा निषेध करण्यासाठी, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी-२०२६ रोजी जोरदार निदर्शने करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. तीन शेतकरी काळ्या कायद्यांप्रमाणेच, केंद्र सरकारने या चार काळ्या कामगार कायद्यांच्या माध्यमातून श्रमिकवर्गाचं शोषण करण्याचा कट रचला असून, कामगारवर्ग व कामगार-चळवळ उध्वस्त करु पाहणाऱ्या मोदी-शहा सरकारचा निषेध व्यक्त करण्यासाठीच ही निदर्शने करण्यात आली असल्याचे स्पष्ट प्रतिपादन राजन राजे यांनी यावेळी केले.** एकीकडे नव-अस्पृश्यता म्हणून ओळखली जाणारी कंत्राटी-कामगारपद्धत ही, कामगारांना गुलामगिरीत ढकलत असतानाच, या चार काळ्या कामगार कायद्यांमुळे




अवघे कामगारजगत उध्वस्त होणार आहे. त्यामुळे काळ्या कामगार कायद्यांचा नायनाट, हीच कामगारांच्या स्वातंत्र्याची पहाट ठरणार असून, काँग्रेसचे नेते व इंडिया-आघाडीचे अध्वर्यू राहुल गांधी यांनीदेखील या चार काळ्या कामगार कायद्याला कडाडून विरोध केला आहे. काँग्रेस सत्तेवर येताच, हे काळे कायदे रद्द करु, असं वक्तव्य राहुल गांधी यांनी नुकतेच लोकसभेत केले होते, त्याबद्दलही राजन राजे यांनी, आपल्या भाषणात राहुल गांधींचे जाहीर कौतुक करुन, त्यांचे आभार मानले.

दरम्यान, **आपल्या तडाखेबंद भाषणात राजे यांनी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा खरपूस समाचार घेतला. अहिल्यानगर येथील सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीत बोलताना त्यांनी, कारखानदारांची बाजू घेत, ''उद्योगजकांना त्रास देणाऱ्यांना ठोकून काढू'' अशी भाषा वापरली होती. दावोस परिषदेच्या माध्यमातून, महाराष्ट्रात कोट्यवधी डॉलर्सचे उद्योगधंदे आणण्याची भाषा करणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळातच, मराठी कामगार देशोधडीला लागला, त्यांच्याच सरकारने कंत्राटीपद्धतीमुळे नोकऱ्या असुरक्षित केल्या, महाराष्ट्रातील उद्योग याच भाजपने राज्याबाहेर नेले आणि तेच मुख्यमंत्री, उद्योजकांची बाजू घेत, आपल्या न्याय्य-हक्कांसाठी आंदोलन करणाऱ्यांना ठोकून काढण्याची भाषा करतात, हे संतापजनक असल्याचा हल्लाबोल राजन राजे यांनी यावेळी केला.**

याप्रसंगी डावे पक्ष आणि कामगार संघटनांनी पुकारलेल्या देशव्यापी संपाला पाठिंबा देण्यासाठी, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने, ही जोरदार निदर्शने करण्यात आली होती. यावेळी कॉ. शिशिर ढवळे, कॉ. उदय चौधरी, समाजवादी नेते जगदीश खैरालिया, संजय मंगला गोपाळ, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या वंदना शिंदे, 'धर्मराज्य पक्षा'चे सचिव नरेंद्र पंडित, प्रवक्ते समीर चव्हाण, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव महेशसिंग ठाकूर, प्रसिद्धीप्रमुख संजय दळवी आदी पदाधिकाऱ्यांसह, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स यांच्यासोबतच विविध क्षेत्रातील कंत्राटी व कायम कामगार तसेच, 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे कामगार सभासद मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# ''लंडनमध्ये भाजप नसल्याची खंत: ॲन्ड्र्यूचं 'राजकीय' दुर्दैव''

इंग्लंडचा माजी राजपूत्र ॲन्ड्र्यूच भाजपात गेला असता तर, त्याची अटक टळली असती! दुर्दैवं त्याचं की भाजपाची 'शाखा' लंडनमध्ये नाही.

भाजप तिथं असता तर, त्यानं लगेच पक्षप्रवेश केला असता. प्रदेशाध्यक्षांनी 'जय श्रीराम'च्या उद्घोषात त्याला उपरणं घालायचाच अवकाश, की बकिंगहॅम पॅलेसमध्ये त्याला अटक करायला आलेले बॉबी पोलीस पटापट परागंदा होऊन शेजारच्या ग्रीन पार्कात झाडीमागे जाऊन लपले असते. अटक करायला निघालेले तिथले ईडी आणि सीबीआयवाले 'आ गया अपने तरफ, फिर भी अरेस्ट करने का है तो बोलो, नही तो हमको घर को जान्देव' म्हणत प्रदेशाध्यक्षापुढे उभे राहिले असते.

ॲन्ड्र्यूला ग्रीनवीच विधानसभा मतदारसंघातून भ्रजपाचं तिकीट लगोलग मिळालं असतं. तिकडचे मुख्यमंत्री प्रचाराला आले असते आणि 'ख्रिश्चन खतरे में'चा नारा देऊन गेले असते. लंडनच्या लोकांना आणि तिथल्या इव्हीएमला लगेच ते पटून ॲन्ड्र्यू पन्नास-साठ हजारांच्या मताधिक्यानं निवडून आला असता, मंत्रीही झाला असता, संघाच्या संचलनात उपस्थित राहिला असता. संचलनावर पुष्पवृष्टी वगैरे केली असती. एप्स्टिन फाईल वगैरे तुच्छ बाबींना महत्व न देता, स्वतः पंतप्रधानांनी त्याच्या बड्डेला अभिनंदनाचं ट्वीट केलं असतं. येणे वरे ॲन्ड्र्यू मजेत आयुष्य कंठू शकला असता.

पण दुर्दैवं की, त्याला अटकेत जावं लागलं. दीडशे वर्ष इथं राहिले पण इंग्रज भारतीयांपासून काहीही शिकले; नाहीत, म्हणून ॲन्ड्र्यूवर आज असा अन्याय होत आहे.



# आपण धर्म जपतो आहोत की धर्माचा मुखवटा?

ओपीडीमध्ये एक भगवे वस्त्र परिधान केलेले साधू महाराज आले होते. तपासणी झाली आणि सहजच अध्यात्मावर चर्चा सुरू झाली. सध्या मी संत तुकाराम महाराज यांच्यावर वाचत असल्यामुळे मनात बरेच प्रश्न होते.

मी त्यांना विचारलं, ''आपण गावोगावी कथा करता, प्रवचन देता; पण खरंच सांगा, त्या कथांमुळे लोकांच्या वागण्यात किती बदल दिसतो?''

ते थोडे शांतपणे म्हणाले, ''डॉक्टर, कथा ऐकायला बहुतेक वेळा वयस्कर लोक येतात. युवक फारसे येत नाहीत. जे थोडेफार समाजप्रबोधन होते, तेवढेच.''

त्यांचं उत्तर प्रामाणिक होतं; पण, मनात विचार आला, जर बदलाची खरी गरज युवकांना आहे; तर, मग आपण तिथपर्यंत पोहोचायचा प्रयत्न का करू नये?

मी म्हणालो, ''मग लहान मुलांमध्ये चांगले विचार रुजवायला हवे ना? शाळांमध्ये, कॉलेजमधे जाऊन संतांचे विचार साध्या भाषेत सांगायला काय हरकत आहे? तुकाराम महाराजांचे विचार इतके प्रॅक्टिकल आहेत की, मुलांची, तरुणांची विचारसरणी बदलायला वेळ लागणार नाही.''

ते म्हणाले, ''आम्ही भगवे वस्त्र घालून शाळेत गेलो तर कोणी परवानगी देणार नाही. संविधान धर्मनिरपेक्ष आहे.''

मी सहज म्हणालो, ''मग भगवे वस्त्र बाजूला ठेवा. धर्म शिकवू नका; पण, धर्मातील चांगले विचार शिकवा. माणुसकी शिकवा.''

ते थोडे रागावल्यासारखे म्हणाले, ''धर्म सोडून कसं



चालेल? मुलांना धर्म कळलाच पाहिजे.''

त्याक्षणी मनात तुकाराम महाराजांचे शब्द घुमले

**''जे का रंजले गांजले**
**त्यासी म्हणे जो आपुले**
**तोचि साधू ओळखावा**
**देव तेथेंचि जाणावा.''**

साधूपणाची व्याख्या किती साधी! रंजलेल्यांना आपले मानणारा, तोच साधू. देव तिथेच आहे, जिथे माणुसकी आहे. मग तुम्ही कुठली वस्त्र घालता, याने तुमचं साधुत्व ठरत नाही ..

पण, तुकाराम महाराज इथेच थांबत नाहीत. ते ढोंगीपणावर तितक्याच तीव्रतेने प्रहार करतात. ते म्हणतात

**''काय थोर जाले तीर्थासी जाऊन**
**शरीर धूऊन काय आले ।।''**

फक्त तीर्थयात्रा करून, शरीर धुऊन काही मोठेपण येत नाही. बाह्य आचरणाने, किंवा विशेष कपडे घालून आत्मा शुद्ध होत नाही.

आणि किती धारदार उपमा देतात ते

**''व्याल्याविण करी शोभनतांतडी**
**चार ते गधडी करीतसे ।।''**

जिने कधी प्रसूतीच अनुभवलेली नाही, ती जर बाळंतपणाचा सोहळा साजरा करत असेल; तर, ते केवळ विनोदीच नव्हे तर, पोकळही आहे. त्यात अनुभव नाही, सत्य नाही, फक्त दिखावा आहे.

तसंच, ज्याने कधी सत्याचा स्पर्शही केलेला नाही, ज्याच्या आचरणात कधी साधुत्व उतरलेले नाही, तो जर मोठमोठ्या आध्यात्मिक गोष्टी बोलत असेल; तर, ते केवळ शब्दांचे प्रदर्शन आहे. अध्यात्म अनुभवातून येतं; ते पोशाखातून नाही, घोषणांतून नाही; तर, जगण्यातून प्रकट होतं.

तुकाराम महाराज जणू सांगतात, आधी अनुभवा, मग बोला. आधी जगा, मग शिकवा. शब्दांच्या आड लपलेला अहंकार हा अध्यात्म नाही.

आज आपल्या समाजात नेमकं हेच घडताना दिसत नाही का? चांगले विचार पसरवण्यापेक्षा, आपापला धर्म दाखवण्याची जास्त घाई आहे. वस्त्रं, घोषणाबाजी, ओळख, सगळं आहे. पण 'रंजले गांजले' कुठे दिसतात आपल्या प्रवचनांत?

तुकाराम महाराज म्हणतात,

**''आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने**
**शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।।''**

त्यांच्याकडे सत्ता नव्हती, संघटना नव्हती, बाह्य वैभव नव्हतं; पण, शब्द होते आणि ते शब्द अनुभवातून आलेले होते. म्हणून ते आजही जिवंत आहेत. ...पृष्ठ क्र. ४ वर

## 'डीआरटी अँथिया' कंपनीतील कामगारांना, भरघोस पगारवाढ! ...पृष्ठ क्र. १ वरुन



येताच, मा. राजन राजे यांनी, कामगार सभासदांना आपल्या न्याय्यहक्कासाठी संपावर जाण्याशिवाय पर्याय नसल्याचे आदेश दिले. त्यासंदर्भात, कंपनी व्यवस्थापनाला ''संपाची सूचना'' देण्यात आली होती. अखेर व्यवस्थापनाने सामंजस्याची भूमिका घेत, युनियनने पाठवलेला सेवाशर्तींचा मसुदा मंजूर करुन, पगारवाढीचा त्रैवार्षिक करार संपन्न केला. या करारामुळे कामगारांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. यानिमित्ताने 'डीआरटी अँथिया'च्या कामगार सभासदांचे अभिनंदन करताना मा. राजन राजे यांनी म्हटले की, ''कामगारांनी 'कामगारधर्म' जोपासून, आपलं आत्मभान जागं केलं तर, भांडवली व्यवस्थेला शरण येण्यावाचून गत्यंतर नाही. कामगारांना आपली ताकद कळली पाहिजे. कारण, कारखान्यात घाम गाळून उत्पादन काढणारा कामगारच, राष्ट्रीय संपत्ती निर्माण करीत असतो. आज कामगारांच्या एकजुटीचा विजय झाला आहे, तुमच्या आतले दिवे आता कुठे पेटायला सुरुवात झालीय, ते तसेच धगधगत ठेवलेत तर, बाहेरच्या सूर्याची तुम्हाला गरजच भासणार नाही!'' अशा जाज्वल्य शब्दांत 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, 'डीआरटी अँथिया' कामगारांना पुन्हा एकदा शुभेच्छा दिल्या आणि रोहा-धाटाव परिसरातील उर्वरित कामगार-कर्मचारीवर्गाने या करारातून फार मोठा धडा घेण्याचे संकेत दिले!

**हर्षवर्धन सपकाळ यांच्या अगोदर गिरीश कर्नाड यांनीदेखील, टिपू सुलतान यांचा याच गौरव केला होता आणि तो रास्तच आहे. असो, शिवाजी महाराजांचा पुळका आलेल्यांना काही प्रश्न...**

''समर्थ नसते तर, शिवाजीला कोण विचारतो'' असं लिहिणाऱ्या राम गणेश गडकरींची लाज काढली का फडणवीसांनी?

शिवाजी महाराजांचे पितृत्व दादोजी कोंडदेवकडे घेण्यासाठी, सूचक विकृत लेखन करणाऱ्या आणि जेम्स लेनला कानगोष्टी पुरवणाऱ्याबाबा पुरंदरेची लाज काढली का फडणवीसांनी ?

''रामदास नसता तर, शिवाजी घडलंच नसता'' हे बरळणाऱ्या कोशारीची लाज काढली का फडणवीसनी?

''मोदी म्हणजे, शिवाजी महाराजांसारखे श्रीमंत योगी'' असे उद्गार काढणाऱ्या, अयोध्येच्या राम मंदिराचा ट्रस्टी गोविंद देव महंत याची लाज काढली का फडणवीसनी?

''औरंगजेबाला लाच देऊन शिवाजीराजे आग्र्यातून सुटले'' म्हणणाऱ्या राहुल सोलापूरकरची लाज काढली का फडणवीसनी?

इतिहासकार इंद्रजीत सावंतांना ब्राह्मणी विकृतीने, लदबदलेली अर्वाच्य भाषा वापरणाऱ्या कोरटकरला काय शिक्षा दिली फडणवीस यांनी? ***...धम्मसंगिनी***

# भाजप-संघीयांनी सगळी भारतीय-व्यवस्थाचं आपली 'चपराशी' बनवून टाकलीय...

**भारत सरकारच्या निती-आयोगाने जाणिवपूर्वक सदोष 'पर्यावरणीय आघात-मोजमाप' करुन (EIA) व 'NGT'पुढे जाताना 'Terms of Reference' मध्येच बदमाषीने बदल केला व तो 'कॉम्प्रमाईज्ड-NGT'ने मान्य केलेला दिसतोय!**



अंदमान निकोबार बेटांच्या विकासासाठीचा ९२ हजार कोटींचा (पूर्वी जाहीर केलेला प्रकल्पखर्च ७५ हजार कोटी... म्हणजे, भ्रष्टाचार व दलालीच्या माध्यमातून 'मारुतिच्या शेपटा'सारखा खर्च वाढतोच आहे)

प्रकल्प-आराखडा **NGT**ने मंजूर केलेला दिसतोय. या प्रकल्पामुळे 'युनेस्को'ने 'जागतिक संरक्षित जंगल' तसेच, 'जागतिक नैसर्गिक वारसा' असा विशेष दर्जा दिलेल्या 'ग्रेट निकोबार'च्या जंगलांवर आता घाला घातला जाणार आहे.

या आराखड्यानुसार, ग्रेट निकोबार बेटावर आंतरराष्ट्रीय स्तरावरचं मोठं बंदर, आंतरराष्ट्रीय विमानतळ, ऊर्जाप्रकल्प आणि प्रचंड मोठी वसाहत उभारण्याचा (ज्यात, तब्बल ५५ मीटर रुंदीचा रस्ता आणि मुळात फार थोड्याप्रमाणात उपलब्ध असलेलं गोडं पाणी श्रीमंतांच्या गोल्फ कोर्ससाठी वापरलं जाणार) सरकारचा नापाक इरादा आहे... ज्यामुळे, ग्रेट निकोबार 'बायोस्फिअर रिझर्व्ह' आणि 'गॅलॅथा बे अभयारण्य' या दोन संरक्षित भागांचा बळी जाणार आहे. जवळपास ९-१० लाख संख्येनं असलेल्या शेकडो नव्हे; तर, हजारो वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या वृक्षराजीवर (पुराणवृक्ष) कुऱ्हाड पडून, ग्रेट निकोबारच्या १००० चौ. कि. मी. भूभागापैकी एक चतुर्थांश म्हणजे, २५० चौ. कि. मी. जंगलाची भयंकर कत्तल होणार आहे! आपल्या सत्यानाशी भांडवली-दुराग्रहाने, सुमारे ६५० प्रकारच्या वनस्पती आणि ३३० वन्यप्राण्यांच्या प्रजातींचं माहेरघर असलेलं... जगातलं अतुलनीय, अत्यंत दुर्मिळ असं हे 'जैववैविध्य' नष्ट करुन, तुम्ही निसर्गाचं 'थडगं' आणि पर्यावरणाचं 'स्मशान' बांधू पहाता आहात!

बरं, हे सगळं निसर्ग-विध्वंसन कशासाठी चाललंय... ग्रेट निकोबार बेटांच्या जैविक-विकासासाठी नव्हे; तर, दिल्लीश्वरांच्या खास मर्जीतल्या बड्या भांडवलदारांच्या आणि तिथे नव्याने आलिशान वसाहतीत रहायला येणाऱ्या अदमासे ६ लाख अतिश्रीमंतांच्या ऐय्याशीसाठी (बहुतेक भविष्यात अमेरिकेच्या 'एपस्टिन-फाईल्स'नंतर, भारतातल्या भाजप-संघीय बड्या राजकारण्यांच्या व भांडवलदारांच्या 'ग्रेट निकोबार-फाईल्स' उघडाव्या लागतील)!

हसदेव जंगल (छत्तीसगड), आरे कॉलनी (बुलेट-ट्रेन, मुंबई) वगैरे प्रकल्प व नाशिकच्या 'कुंभमेळा' नावाच्या 'दंभमेळ्या'साठी जंगलाचं भक्षण करुनही, न भागणारी अशी कुठली 'बकासुरी-भूक', या उठताबसता हिंदुत्वाचा नौटंकी गजर करणाऱ्या भांडवल'शहां'ना लागलीय? हिंदूधर्म, हा मूलतः 'निसर्ग-पर्यावरणस्नेही' असताना, असं उफराटं वर्तन त्यांनी पोसलेले 'शहेनशहा' करत असताना...तथाकथित 'हिंदुत्ववादी' दिवट्यांना, याविषयी काहीच वाटत नाही?

पूर्वी लहानपणी आम्ही 'लाकूडतोड्या'ची गोष्ट मन लावून ऐकायचो... आताशी, ऐकावी लागते, ती भाजप-संघीय 'जंगलतोड्या' सरकारची आणि उद्या ऐकावी लागेल कहाणी...अमेरिकेतल्या व्हर्जिनिया आयलंड्समधील 'एपस्टिन-फाईल्स'सारख्या, शरमेनं भान खाली घालायला लावणाऱ्या अतिश्रीमंतांच्या नृशंस-ऐय्याश कथा! ग्रेट निकोबार प्रकल्पाच्या उभारणीद्वारे एका पाचूच्या बेटावरील हिरव्याकंच जंगलांचा विनाश करण्याचा घाट, विद्यमान भारत सरकारने घातला आहे. अशा 'विनाशकाले विपरीत बुद्धी'च्या धोरणाने आपण भारतातल्या अंदमान-निकोबारचंच नाही; तर, जगाच्या पर्यावरणाचं नुकसान करतो आहोत... याचं भान, या बेभान 'गुजराथ-लॉबी' सरकारला राहिलेलं नाही. ''पृथ्वीवरचा निसर्ग, हाच खरा परमात्मा आणि माणूस, हा त्या 'परमात्म्याचाच अंश' म्हणजे, निसर्गाचाच अविभाज्य भाग आहे'', हेच हिंदुधर्माचं वैश्विक-प्रतिपादन राहिलेलं आहे. हिंदुंच्या एकातरी धर्मग्रंथात, या अशा निसर्ग-पर्यावरणाचा विध्वंसक बळी देणाऱ्या, विनाशकारी 'विकासा'चा ओझरता तरी पुरस्कार केला गेलाय का किंवा त्याला पाठीशी घातलं गेलंय का? 'वसुधैव कुटुंबकम्' तसेच, 'अहम् ब्रह्मास्मि' म्हणत, चराचरात परमात्म्याला पहाणाऱ्या 'शिवबा-संतां'च्या महन्मंगल 'हिंदुत्वा'चा ओजस्वी 'महासागर' कुठे आणि जातधर्म-विद्वेषानं भरलेलं, अन्याय-अत्याचार-शोषणाचा वरवंटा फिरवणारं आणि निसर्ग-पर्यावरणाचा विध्वंस करणारं...भाजपाई 'हिंदुत्वा'चं सडलेलं 'डबकं' कुठे?

अंदमान-निकोबारच्या जंगलांची हाक... या मोदी-शहा रासवट-राजवटीत भारताच्या मुख्य भूमीपर्यंत पोहोचायला तयार नाही, याचा अर्थ आम्ही खऱ्याअर्थाने 'हिंदुधर्मीय' नव्हेत... तेव्हा बनावट-ढोंगी हिंदुत्ववाद्यांनो, आपले ''दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे'', ही नौटंकी बंद करा!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष... भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष' **...The First Green-Political Party Of India)**

## धर्माचा मुखवटा? ...पृष्ठ क्र. ३ वरुन

कधी कधी वाटतं, आपण जर आपले धार्मिक वस्त्र, आपले अहंकारी मुखवटे काही काळासाठी बाजूला ठेवले आणि फक्त 'माणुसकी' हा एकच धर्म स्वीकारला; तर, जग किती सुंदर होईल!

मुलांना जर आपण धर्माची ओळख देण्यापूर्वी माणुसकीची ओळख दिली, तर कदाचित त्यांना पुढे धर्मासाठी भांडावं लागणार नाही.

शेवटी प्रश्न इतकाच, आपण धर्म जपतो आहोत की, धर्माचा मुखवटा?

तुकाराम महाराजांनी कधीही धर्म सोडायला सांगितले नाही. पण, त्यांनी ढोंग सोडायला नक्की सांगितले...

आणि कदाचित, आज समाजाला प्रवचनांची गरज नाही,
गरज आहे प्रामाणिकतेची, अनुभवातून आलेल्या शब्दांची
आणि त्या साध्या पण खोल ओळीची...
रंजलेल्यांना आपले मानः देव तिथेच आहे!

***डॉ. स्वप्नील भालेकर,*** नेत्रतज्ञ शिरूर

# शिवराय-गांधीजी-आंबेडकर यांचा एकमेकांशी काय संबंध?

– **ज्ञानेश महाराव** (ज्येष्ठ पत्रकार- संपादक)

भारताच्या प्रजासत्ताक लोकशाहीचं सार या त्रिमूर्तींच्या ''स्वराज्य, स्वातंत्र्य आणि समता'' या तीन तत्त्वांत आहे. म्हणूनच तिघांपुढे एकत्रित नतमस्तक झाले पाहिजे.

**माणसाचा मोठेपणा त्याच्या सावलीवरून ठरतो. ही सावली त्याच्या कार्य-स्मरणाची असते. भारतीय राजकारणात अनंत व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कार्य-कर्तृत्वाचा ठसा उमटवलाय. त्या सर्वात छत्रपती शिवराय, महात्मा गांधी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा प्रभाव अजोड आहे. त्यांच्या केवळ स्मरणाने पिढ्यान् पिढ्यांना सन्मानाने जगण्याचं बळ मिळतंय. राष्ट्रनिष्ठेचा संस्कार मिळतोय. या तिघांच्या नेतृत्वात, कर्तृत्वात असं कोणतं वेगळेपण होतं?** तर, हे तिघेही लोकनेते होते. तथापि, त्यांच्या लोकनेतृत्वाला निश्चित अशा विचारतत्त्वांची बैठक होती आणि ती तत्त्वं प्रत्यक्षात आणण्याचा आग्रही ध्यास, हा त्यांच्या कार्याचा विशेष होता. 'लोकनेतृत्व करायचं तर तत्त्वं गुंडाळून ठेवावी लागतात आणि तत्त्वांचा आग्रह धरायचा तर लोक मागे येत नाहीत', असा भारतीय समाजकारणाचा इतिहास आहे. वर्तमानातूनही त्याची साक्ष मिळते. परंतु, शिवाजी महाराज, महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर या इतिहासास अपवाद ठरले म्हणून त्यांचे कार्य ऐतिहासिक झाले. छत्रपती शिवरायांनी साडेतीनशे वर्षांपूर्वी हिंदवी राज्याचीच नव्हे, स्वराज्याची कल्पना मांडून ती प्रत्यक्षात आणली. महात्मा गांधींनी ब्रिटिशांना 'चले जाव' म्हणतानाच येणाऱ्या स्वातंत्र्यात ''लोकस्वातंत्र्य'' असावे, हा आग्रह धरला. डॉ. आंबेडकरांनी तर, सामाजिक समतेच्या प्रतिष्ठापनेसाठी अवघ्या आयुष्याचाच होम केला. भारताच्या प्रजासत्ताक लोकशाहीचं सार या त्रिमूर्तींच्या ''स्वराज्य, स्वातंत्र्य आणि समता'' या तत्त्वांत आहे. देशाला उभारणारी-घडवणारी ही तत्त्वंच भारताची राष्ट्रसूत्रं झाली आहेत. त्यात समाजाला संघटितपणे पुढे नेण्याचं सामर्थ्य आहे. **'स्वराज्य', 'स्वातंत्र्य' आणि 'समता' या तीन तत्त्वांची गुंफण आणि त्यातून निर्माण झालेली भारतीय लोकशाही हेच या त्रिमूर्तींचं लोकोत्तर कार्य आहे. मात्र, प्रत्यक्षात हेच कार्य विसरून या राष्ट्रपुरुषांना वेगवेगळं करून पुजलं-भजलं जातंय. ते गैर आहे. या राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या-मयंत्यांच्या वेळी पोलीस बंदोबस्त चोख ठेवावा लागतो, ही तर समस्त भारतीयांसाठी शरमेची गोष्ट आहे. छत्रपती शिवराय, महात्मा गांधीजी आणि डॉ. आंबेडकर यांना मानणाऱ्यांमध्ये आजही वैचारिक आणि सामाजिक अंतर आहे. ते या राष्ट्रपुरुषांच्या कार्याचा घोर अपमान करणारे आहे.**

'स्वराज्य', 'स्वातंत्र्य' आणि 'समता' या तत्त्वांची थोरवी जशी परस्परांवर अवलंबून आहे, तशीच शिवाजी महाराज, महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्याची ऐतिहासिकता हीदेखील परस्परांवर आधारलेली आहे. 'स्वराज्य' आणि 'स्वातंत्र्य' नसेल, तर 'समता' काय चाटायचीय? आणि 'स्वराज्य' आणि 'समता' असेल, पण त्यात 'स्वातंत्र्य' नसेल तर त्याचा काय उपयोग? तेव्हा ''डॉ. आंबेडकरांचा विजय असो'' म्हणताना ''जय शिवाजी! जय गांधीजी!'' असाही जयजयकार व्हायलाच हवा. तसंच, ''छत्रपती शिवाजी महाराज की... जय''चा नारा लगावताना ''महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर'' यांचाही गजर करण्यास विसरू नये. कारण, स्वातंत्र्य आणि समतेशिवाय छत्रपती शिवरायांच्या स्वराज्याची महतीच स्पष्ट होऊ शकत नाही!

## डॉ. आंबेडकरांना गांधीजींची काळजी

छत्रपती शिवराय, महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांचं जीवनकार्य हे राष्ट्र उभारणीचं शास्त्र आहे. त्या शास्त्राचा संस्कार करवून घेण्याऐवजी त्यांची नावं कुणाही विरोधात शस्त्रासारखी वापरली जाऊ नयेत. महात्माजी काँग्रेसवाल्यांचे, डॉ. आंबेडकर दलितांचे आणि शिवराय या दोघांनाही विरोध करणाऱ्यांचे, अशी या महापुरुषांची विभागणी झालीय. ती राजकीय स्वार्थासाठी आहे. या तुकड्यातुकड्यांतून होणाऱ्या त्यांच्या विचारतत्त्वांच्या प्रसारामुळे समाजात अहंकार बळावतोय आणि मूर्खपणा वाढतोय.

**महात्माजी आणि डॉ. आंबेडकर यांच्या जन्माच्या अडीचशे वर्षं आधी शिवरायांचा जीवनकाल होता. तथापि, दोघांनीही शिवरायांच्या समताधिष्ठित राज्यपद्धतीला आदर्श मानलं आहे. खेडे स्वयंपूर्ण व्हावे, ग्रामविकास व्हावा, या गांधीविचारांची बीजे शिवशाहीत आहेत. राष्ट्रप्रेम रुजवणाऱ्या शिवरायांच्या महाराष्ट्रभूमीत कार्यकर्त्यांचं मोहोळ आहे; म्हणून, गांधीजी साबरमतीचा आश्रम बंद करून वर्धा येथे आले. तिथे ''सेवाग्राम'' उभारून त्यांनी महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानली. 'काँग्रेस'चं नेतृत्व स्वीकारल्यावर ''छत्रपती शिवाजी महाराज की जय !... तिलकमहाराज की जय!...''** म्हणत भारतभर फिरले. महात्माजींना डॉ. आंबेडकरांच्याही कार्याबद्दल आस्था होती. किंबहुना, स्पृश्यांच्या टाळक्यातून अस्पृश्यतेचा अमानवी व्यवहार घालवण्यास महात्माजींची ''हरिजन सेवा''च कारणीभूत ठरलीय. त्याचा लाभ डॉ. आंबेडकरांना जरूर झालेला आहे.

गांधीजी आणि डॉ. आंबेडकर यांच्यात वैचारिक भेद होते. कारण, दोघांचे समाजसुधारणेचे मार्ग भिन्न होते. मात्र, उद्दिष्ट एकच होते! 'मानवतेचं रक्षण करणे', 'मानवतावादा'ला बढावा देणे, हेच दोघांचे समान उद्दिष्ट असल्यामुळे उभयतांना परस्परांबद्दल आस्था होती. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी दुसऱ्या दिवशी पत्रकार परिषद घेतली. त्यात ते म्हणाले, **''आज मी समाधानी आहे. गांधींना दिलेलं आश्वासन मी पूर्ण केलंय.'' डॉ. आंबेडकरांचं हे समाधान गांधीद्वेषातून नव्हे, आस्थेतून प्रकट झालेलं होतं. डॉ. आंबेडकरांच्या नियोजित ग्रंथलेखनात, महात्मा फुले यांच्या चरित्राप्रमाणे महात्मा गांधींच्याही चरित्राचा समावेश होता. ते जाहीरपणे म्हणालेही होते, ''माझ्यापेक्षा गांधींना अधिक कोण ओळखतं? म्हणून मीच त्यांचं चरित्र लिहिणार आहे.'' गांधीजींच्या जिवाचीही चिंता आंबेडकरांना होती. त्यांनी गांधींना अनेकदा सावधही केलं होतं. ते गांधींना म्हणालेही होते, ''एक वैश्य, बनिया-ब्राह्मणांसकट सर्वांचे नेतृत्व करतो ही गोष्ट चातुर्वर्णी (म्हणजे सनातनी, कर्मठ) ब्राह्मणांना माहीत नाही, असं समजू नका. पण, एक गोष्ट तेवढीच खरी की, जोवर तुम्ही ब्राह्मणांचे हितसंबंध जोपासता, तोवर तुमच्या महात्मापणाला धोका नाही. ज्या दिवशी तुम्ही ब्राह्मणांच्या हिताला बाधा आणाल, तेव्हा तुमची काय गत होईल, ते मी सांगण्याची गरज नाही!''** (बाबासाहेबांनी ब्राह्मणांबाबत गांधीजींना दिलेला हा इशारा आजही तंतोतंत लागू होतो. ह्याची साक्ष म्हणजे, उत्तर भारतात पटलेलं UGC विरोधातील आंदोलन! UGCA ''विद्यापीठ अनुदान आयोग''ने २०२६च्या नव्या नियमावलीत कॉलेजांमधील जातीभेद रोखण्यासाठी प्रत्येक विद्यापीठ आणि महाविद्यालयात ''इक्विटी समिती'' स्थापण्याचा निर्णय जाहीर करताच; त्याविरोधात उत्तर भारतात ''भाजप- संघ'' परिवारातील कथित हिंदुत्ववादी संघटनांनी ''अब मोदी तेरी कबर खुदेगी'' अशा घोषणा देत आंदोलन पेटवले. ह्या आंदोलकांत अधिक संख्येने ब्राह्मण असावेत, हा योगायोग नाही. तसेच, इतक्याने मोदींची बरोबरी गांधीजींशी होत नाही. असो.)

डॉ. आंबेडकरांचे शब्द, खुनी नथुराम गोडसे ह्याने खरे केले. गांधींबद्दल आंबेडकरांच्या मनात असलेली ही आस्था, त्यांच्या अनुयायांनीही आपल्यात रुजवायला पाहिजे होती. त्यासाठी गांधीजींना मानणाऱ्यांनीही पुढाकार घ्यायला पाहिजे होता. सत्तास्वार्थासाठी दलित नेत्यांकरवी दलित समाजाला वापरणारी ''काँग्रेस वाईट, म्हणून काँग्रेसने ज्यांना आपल्या मोठेपणासाठी वापरते ते गांधीजीही वाईट,'' हा अविचार डॉ. आंबेडकरांना मानणाऱ्यांनी झटकला पाहिजे.

## शिवाजीमहाराजांची शिकवणूक

डॉ. आंबेडकरांच्या मनात शिवाजी महाराजांबद्दल दुरावा असण्याचं कारणच नव्हतं. कारण, सामाजिक समानतेच्या बाबतीत शिवाजी महाराज काळाच्या खूप पुढे होते. पूर्वाश्रमीच्या महार-मांग ह्या शूर जातींना पेशवाईच्या काळात अस्पृश्य गणलं गेलं. पण, शिवरायांनी याच जातीतील शूरवीरांना गडकरी आणि सैन्याधिकारी पदांवर नेमून त्यांचा सन्मान केला होता. शिवशाहीची स्थापना करताना त्यांनी वतनदारीप्रमाणे जातीचाही अधिकार मोडून काढला. गुणांना, कर्तबगारीला श्रेष्ठ मानलं म्हणूनच, वाई परगण्यातील नागेवाडी गावची पाटीलकी, नागनाक महार यांना... **पृष्ठ क्र. ६ वर**

**शिवराय–गांधीजी–आंबेडकर** ...पृष्ठ क्र. ५ वरुन

मिळाली. शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळात वेगवेगळ्या जातींची मंडळी होती. त्या सर्वांची बैठक सारख्याच उंचीची होती. ती पाहून देशमुखांनी नाराजी व्यक्त केली. तेव्हा महाराज कडाडले, ''स्वराज्यात सर्वच बैठकी एकाच उंचीच्या असतील. एकच फक्त त्यापेक्षा उंच असेल; ते म्हणजे, जनताजनार्दनाने दिलेलं छत्रपतीचं राजसिंहासन!''

'रयतेचा राजा' असाच शिवरायांचा लौकिक होता. जनतेच्या सुख–दुःखांची त्यांना जाण होती आणि जबाबदारीचं भान होतं. ''लोकनेते'' म्हणवून घेणाऱ्या मंडळींनी शिवाजी महाराजांच्या कार्यातून खूप काही शिकण्यासारखं आहे. त्यातील शिकवण किती झेपेल, हा प्रश्न असला तरी, शिवरायांची एक गोष्ट जरूर आत्मसात करण्यासारखी आहे. आजकाल कुठे शासकीय खर्चातून इमारतींचं, पुलाचं, बोगद्याचं, धरणाचं, रस्त्याचं; इतकंच नव्हे तर, सार्वजनिक मुतारीचंही बांधकाम झालं की, त्यावरच्या कोनशिलेवर स्थानिक पुढाऱ्यांच्या नावांसह उद्घाटन करणाऱ्या मंत्र्याचंही नावं लिहिलं जातं. ही कामं जनतेच्या पैशांतून उभी राहिलेली असतात. लोकप्रतिनिधींनी अथवा पुढारी म्हणवून घेणाऱ्यांनी, सरकारी पैसा सत्कारणी लावण्याचं कर्तव्य केलं असेल तर, अशा कोनशिलेवर आपल्या नावांचा उल्लेख करण्याची गरज काय? काळाच्या ओघात ही नावं विरून जातात किंवा पक्ष्यांच्या शिटांनी, कचऱ्याच्या ढिगांनी झाकून जातात. कधी कधी बांधकामाबरोबर या कोनशिलाही गडप होतात. शिवरायांनी स्वराज्याचं तोरण बांधण्यासाठी बरेच किल्ले जिंकले. काही किल्ले आश्चर्यचकित व्हावं, अशा तऱ्हेनी बांधले. पण कुठेही त्यांनी आपल्या नावाचा शिलालेख बसवला नाही. तरी ते गडकोट–किल्ले शिवरायांच्या ऐतिहासिक कार्याची साक्ष देण्यासाठी गेले साडेतीनशे वर्ष ऊन–पाऊस–वारा, परक्यांचा हल्ला पचवत डौलात उभे आहेत.

शिवरायांचा पुतळा त्यांच्या निधनानंतर तब्बल अडीचशे वर्षांनी आकारास आला. १९२३ च्या दरम्यान हा अर्धपुतळा तयार झाला. याउलट, ''संयुक्त महाराष्ट्र'' लढ्यात बदनाम झालेल्या स.का. पाटील (जन्म : ११ ऑगस्ट १८९८ ; निधन : २४ मे १९८१) यांनी आपल्या हयातीतच स्वतःचा ब्रांझचा टोलेजंग पुतळा तयार करवून, मुंबईत ठाकूरद्वारच्या उद्यानात बसवला. स. का. पाटील जाऊन जेमतेम ४५ वर्षं झालीत, पण त्यांचं नाव विस्मरणात गेलंय. नव्या पिढीला 'तो' पुतळा पाहूनही त्यांचा पराक्रम समजत नाही. याउलट, शिवाजी महाराजांचा पराक्रम प्रथम कळतो आणि त्यांचा भव्य पुतळा पाहुनही त्यांचा पराक्रम श्रेष्ठच राहतो! महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्या पराक्रमाची थोरवीही अशीच आहे. अशाच तोलामोलाच्या महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, लोकहितवादी देशमुख, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, प्रबोधनकार ठाकरे, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिवीर नाना पाटील, साने गुरुजी इत्यादी कृतिशील समाजसुधारकांनी हा महाराष्ट्र घडवला आहे. ही माणसं दगडाच्या इतिहासासाठी नव्हती, ही दगडातून इतिहास निर्माण करणारी माणसं होती. ती जाती–पक्ष–संघटनांत वाटून घेण्यासाठी नाहीत, ती भविष्याची संपन्न वाट दाखवण्यासाठी आहेत. त्या सर्वांपुढे एकाच वेळी नतमस्तक होणं, हीच खरी त्यांना आदरांजली आहे; त्यांच्या विचारतत्त्वाची आचारक्रांती आहे!

(पूर्व प्रसिद्धी : दै. देशोन्नती, दि. रविवार. १५ फेब्रुवारी – २०२६)

## रविवारची सुट्टी मिळवून देणारे, भारतीय कामगार चळवळीचे जनक :

# नारायण मेघाजी लोखंडे यांना कृतज्ञ अभिवादन



ज्यांच्या प्रयत्नांमुळे रविवारची सुट्टी मिळाली... पण, लोकांना त्यांचे नावही माहित नाही. काळाच्या ओघात लोकांच्या विस्मरणात गेलेल्या, नारायण मेघाजी लोखंडे या कामगार–नेत्याची, दि. ९ फेब्रुवारी रोजी, १२९वी पुण्यतिथी होती. भारतीय कामगार चळवळीचे एक अग्रगण्य नेते व समाजसुधारक. मूळ गाव पुणे जिल्ह्यातील सासवडजवळचे कन्हेरसर. फुलमाळी शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या लोखंडे यांनी, गरीब परिस्थितीतून माध्यमिक शिक्षण पुरे केले. सुरुवातीस रेल्वे खात्यात कारकून म्हणून व पुढे पोस्ट खात्यात काही काळ नोकरी केल्यावर, लोखंडे यांना मुंबईच्या मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी मिळाली. तेथे त्यांना दहशतीच्या वातावरणात, दिवसातून १३–१४ तास काम करीत असलेले गिरणी कामगार आढळले. त्यांना आठवड्याची सुटीही मिळत नसे; परिणामी, त्यांनी नोकरी सोडून स्वतःस कामगार चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले. त्याकरिता ते कामगारवस्तीतच राहू लागले. लोखंडे यांच्या पत्नीचे नाव गोपिकाबाई व मुलाचे नाव गोपीनाथ असे होते.

**लोखंडे यांनी, १८९० मध्ये 'मुंबई गिरणी कामगार संघ' (बॉम्बे मिलहँड्स असोसिएशन) नावाची भारतातील पहिली कामगार संघटना स्थापिली. एप्रिल–१८९० मध्ये दहा हजार स्त्री–पुरुष कामगारांची मोठी परिषद लोखंडे यांनी मुंबईत भरविली. या परिषदेत स्त्रियांचा मोठ्याप्रमाणात सहभाग होता. मुंबईतील औद्योगिक संघटनांच्या चळवळीतील ही महत्त्वाची घटना समजली जाते. त्यानंतर लगेचच १०जून–१८९० रोजी शासनाने, कामगारांना दर रविवारी पगारी सुट्टी देण्याचा निर्णय जाहीर केला.** १८९१ मध्ये कामगार कायदा संमत करण्यात येऊन, लोखंडे यांच्या काही सूचनांचा त्यात समावेश करण्यात आला. सरकारने त्यांच्या कामगिरीची दखल देऊन, त्यांना 'जे.पी.' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला.

टिळक–आगरकर यांची कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणात झालेली १०१ दिवसांची शिक्षा पूर्ण झाल्यावर १८८३ साली त्यांची सुटका झाली. त्यानंतर त्यांना डोंगरी येथील तुरुंगापासून ते राणीच्या बागेसमोरील मेहेर मार्केटपर्यंत मिरवणुकीने आणण्यात लोखंडे यांनी पुढाकार घेतला होता. तसेच, त्यांच्या सत्कार समारंभांत लोखंडे हे अग्रभागी होते. मुंबईत १८९६ मध्ये प्लेगची मोठी साथ उसळली. या साथीत अनेक लोक मृत्युमुखी पडले. याही वेळी पुढाकार घेऊन लोखंडे यांनी, सरकारी मदतीने प्लेगग्रस्तांसाठी एक 'मराठा इस्पितळ' काढले; परंतु, दुर्दैवाने लोखंडे यांनाच प्लेगने पछाडले व त्यातच त्यांचा दुर्दैवी अंत झाला.



**प्रसंग : १**

६ फेब्रुवारी : अमेरिकेतले कर्जबाजारी बडे शेतकरी (हजारो हेक्टर जमीन कसणारे) ट्रम्प यांनी भारत–अमेरिकेच्या व्यापार–करार घोषित करताच 'शँपेन–पार्ट्यां'चं आयोजन करुन आनंदोत्सव साजरा करतात आणि भारतातले शेतकरी, हवालदिल होऊन पुन्हा एकवार आंदोलनाच्या तयारीला लागतात....

कारण : ट्रम्प–मोदीकृत व्यापार–करार, भारतीय शेतकऱ्यांच्या भल्यासाठी व त्यांचाच हिताचा आहे!

**प्रसंग : २**

१२ फेब्रुवारी : भारतातले कामगार–कर्मचारी, ४ काळ्या कामगार–संहितांविरुद्ध रस्त्यावर उतरुन संतप्त निदर्शनं करतात आणि भारतीय भांडवलदारवर्ग पंचतारांकित हॉटेल्समधून, या नव्या कामगार–संहितांची घोषणा झाल्यापासून उंची मद्याचे घोट घेत, केव्हाचेच नाचून–गाऊन आनंद साजरा करतायत....

कारण , ४ काळ्या कामगार–संहिता, या खूपच कामगारवर्गाच्या हिताच्या; तसेच, त्यांना कमालीच्या लाभदायक आहेत!

(हसू नका... ढोंगी हिंदुत्ववादी व भांडवलदारांचे चक्क 'दलाल' असलेल्या भाजप–संघीय सरकारचं, दुष्ट व फसवं 'तर्कट' आहे हे!)

# पप्पूपासून पोलादी नेता : राहुल गांधींचा उदय आणि सत्तेला दिलेले थेट आव्हान

दीड वर्षात बाजी पूर्णतः पलटली आहे. सतत वीस वर्षे ठरवून केलेल्या सुनियोजित छळातून, अक्षरशः आगीतून सोनं उजळून निघावं, तसा 'राहुल गांधी' नावाचा मनुष्य तावून-सुलाखून बाहेर पडला आहे. आता तो पोलाद बनून, नकली छप्पन्न-इंची छातीतलं भय दररोज उघडं पाडत आहे. मोदी-शहांना राहुल गांधींच्या भाषणाला गैरहजर रहावं लागावं, एवढं भय त्यानं निर्माण केलं आहे. जोशी-वैष्णवसारख्या, मोदींच्या कट्टर माणसांच्या हाताला धरुन ओढतो आणि **''चला आपण एकत्र बोलू पत्रकारांशी'' असं हसतहसत म्हणू शकतो आणि ते चक्क पळून जातात, एवढा तो पोलादी झाला आहे. Authentication दिजीये, असं किरण रिजीजू उठून उभा राहुन म्हणतो आणि विलक्षण भेदक डोळ्यांनी त्याच्याकडे पहात राहुल गांधी, ''Yes I'am Giving It'' म्हणतो आणि राहुल गांधींनी -uthentication दिलं तर, सरकारची उरलीसुरली इज्जत जाईल हा विचार करुन, लोकसभा अध्यक्षांची पाचावर धारणा बसते आणि ते हस्तक्षेप करत, ''आप को मिनिस्टर Authentication मांग रहे है, चेअर ने आप को नही मांगा है, आप मत दिजिये'' अशी व्याकुळता दाखवतात, इतका तो पोलादी झाला आहे. देश हे सगळं रोज पहातोय. मोदी-शहा राहुलचं भाषण समोरासमोर ऐकूही शकत नाहीत, हे ही देश दररोज पहातोय!**

संघ आणि भाजपानं, त्याला पप्पू ठरवण्यासाठी केलेली अक्षरशः करोडो रुपयांची आणि कैक मनुष्य-तासांची 'गुंतवणूक' म्हणजे, आता डबघाईला आलेले समभाग झालेले आहेत. राहुल गांधी आज एका अशा वळणावर उभे आहेत, ज्यात किमान पाच पिढ्यांच्या निंदानालस्तीची परतफेड ते करत आहेत. मोतीलाल नेहरु ते राहुल गांधी, अशा पाच पिढ्यांचा संघ-परिवार आणि त्यांच्या पिलावळींनं दीर्घद्वेष केला. हा द्वेषी संघाच्या आजच्या वयाइतकाच म्हातारा झालेला आहे आणि आता त्या द्वेषाचे मरुन जाण्याचे दिवस लांब नाहीत. कोणाला हे जरा जास्तच झालं असं वाटत असेल तर, त्यांनी गेल्या पाच वर्षातला राहुल गांधींचा आलेख पहावा... ४४ ते १०० एवढ्या खासदारवाढीत तो आलेख वाचता येत नाही, त्यासाठी अजून पलिकडे पहावं लागतं.

या देशापायी आज्जीचा खून आणि बापाच्या शरीराच्या चिंध्या झालेल्या पाहिलेल्या, एका वीस वर्षांच्या तरुण मुलाची मनोवस्था काय असू शकेल? अशा मुलाचं राजकारण जन्मण्याआधी गर्भातच मारुन टाकण्यासाठी, एक सुसज्ज यंत्रणा निलाजरेपणे पंचवीस वर्षे, एक सुनियोजित यंत्रणा राबवते. 'आयटी-सेल' नामक माकडावर करोडोंचा खर्च करुन लाखो पानांचा एक असा कन्टेन्ट तयार करते, ज्यात मोतीलाल नेहरु मुसलमान होते पासून राहुल गांधी ड्रग्ज घेतात, अशा हजारो कथा प्रसारित होतात. त्याही त्या काळात, ज्या काळात सोशलमिडीया हा हनुमान नसून फक्त एक माकड आहे असा शोध अजून लागायचा होता. निर्बुद्ध



पदवीधारकांच्या या देशात ''खरं कशावरुन?'' असं विचारलं तर, ''व्हाट्सअपवर आलंय ना!'' असं शिकलेले लोक सांगत होते त्या काळात. कर्नाटकात काँग्रेसचं सरकार आलं, त्यानं 'भ्रष्टाचारी जनता पक्षा'च्या मिडीया-सेलवर छापा टाकला तेव्हा त्यांना राहुल, नेहरु यांचे अक्षरशः हजारो बनावट फोटो, अत्यंत घाणेरड्या मजकुराचा लाखांनी कंन्टेन्ट सापडला होता. कर्नाटक सरकारनं अमित मालवियवर एफआयआर नोंदवला होता. एका राज्यात एवढं सापडत असेल तर, देशभरात केवढा कंन्टेन्ट तयार होत असेल कल्पना करा... म्हणजे, राहुल गांधींनी किती विष पचवलंय याची कल्पना येईल. विषाला विषानंच उत्तर देण्याइतके काँग्रेसचे कार्यकर्ते आजही देशात आहेत; पण, त्यांच्या नेत्यानं विषाचा नव्हे; तर, गांधींचा मार्ग निवडला... पदयात्रा. दोन पदयात्रा ही, त्या गांधीमार्गाची सुरुवात होती. पदयात्रेनं काय झालं? अचानक लोकांनी स्वतः होऊन काँग्रेसचा सोशलमिडीया सुरु केला. पदयात्रेतले सामान्य लोक राहुल गांधींबरोबरचे फोटो पोस्ट करायला लागले. किती सहज आणि हसत हा माणूस सामान्य लोकांना मिठी मारतोय, हेच या देशाला सवयीचं झालेल्या 'फक्त मी'वादी राजकारणाला पहिला छेद देणारं ठरलं. माध्यमं आणि सामान्य माणसांसोबतची सहजता मोदींना आयुष्यात जमली नाही, ती बिनधास्त राहुल दररोज दाखवत होता. सामान्य माणसांसोबतची पदयात्रा म्हणजे, काँग्रेस ही संघटना नसून चळवळ आहे, हे सिद्ध करणारी मोठी घटना होती.

राहूल गांधी गांजा ओढतो, राहूल गांधी ड्रग्ज घेतो या कुजबूज मोहिमेला राहुलनी हजारो मैल चालत जाऊन उत्तर दिलं. उभा-आडवा देश झपाझप चालत सर केला. संघ-भाजपाच्या कोणत्याही शेठला, जिथं दिवसाला दोन/तीन किलोमीटर एवढाही देह हलवणं अशक्य, तिथं हा माणूस दिवसाला पस्तीस-चाळीस किलोमीटर झपाझप आणि न थकता चालला. गांजा आणि ड्रग्जनी ग्रस्त झालेला माणूस हे करु शकत नाही, हे देशातल्या लहान मुलालाही कळतं. वीस वर्षांचा नीच अपप्रचार, दोन पदयात्रांमध्येच त्यानं धुवून काढला. संघ आणि भाजपाचा खोटारडेपणा लोकांना दाखवून देण्याचा यापेक्षा अधिक चांगला मार्ग कोणता असू शकतो? या दोन पदयात्रांनी ४४ पासून १०० पर्यंत नेलं आणि विरोधी पक्षनेता बनवलं. **लोकांनी कोणताही पैसा, दारु, लाडकी बहिण योजना असं काहीही न घेता हे केलं. संसदेतला पप्पू, बघता बघता पप्पा झाला. कधी मोदींची गळाभेट; तर, कधी ''सर, बाहर वह नही बेचारे मिडीयावाले इंतजार कर रहे है'' अशी ओम बिर्लांची घेतलेली अहिंसक फिरकी, कधी ''सर आप ही बताईये की मै क्या बोलू'' असा सणसणीत टोमणा ते काल विलक्षण भेदक डोळ्यांनी किरण रिजीजूला आवंढा गिळायला लावणे इथपर्यंत राहुल गांधी येऊन पोहोचला आहे.**

आता राहूल गांधींना थांबवणं अशक्य आहे, याची जाणीव गेल्या दीड वर्षात मोदी-शहांना झालेली आहे. तीच तीच जुनी खोटी रट लावण्याशिवाय दोघांच्या हाती आज काहीच लागत नाही. भाषणाच्या वेळी गैरहजर रहाणे एवढाच एक डिफेन्स उरला आहे. राहुल गांधी आता थांबणार नाहीत. जेलला न घाबरणारा मनुष्य, ही हुकूमशहाच्या मनातली सगळ्यात मोठी भीती असते. ''शरम नही आती देश को बेच दिया'' यावर काही थातूरमातूर उत्तर येईलही; पण, केवळ 'एप्स्टिन-फाईल' आणि अदानीची अटक, या दोन कारणांपायी मोदींनी, अमेरिकेसमोर संपूर्ण शरणागती पत्करली, हे लोकांपर्यंत पोहोचायचं ते पोहोचलं. अमेरिकेशी एकतर्फी व्यापार करारानंतर, मोदींनीच स्वतःची प्रतिमा ''नामधारी पंतप्रधान'' अशी करुन घेतली यात शंका नाही. आज अमेरिकेकडे भारताची पत बांग्लादेशपेक्षाही कमी आहे. बांग्लादेशला शून्य तर, भारताला अठरा टक्के निर्यातशुल्क ही बाब लोकांना खटकत आहे. 'एप्स्टिन' आता आता जिवंत झालेलं भूत आहे. अजून तीन लाख फायली उजेडात यायच्या आहेत. आता राहुल गांधी थांबणं अशक्य आहे. राहुल गांधी न थांबणे म्हणजे, गांधी भारी ठरणे. आंबेडकर भारी ठरणे. आम्हाला गांधी-आंबेडकर भारी ठरलेलेच पहायचं आहे, आणखी दुसरं काय पाहिजे?

*...प्रसारमाध्यमातून साभार*

# Sinister American Trade-Deal by 'compromised' Prime Minister...

**Devil lies in the details...**

**Part 1**

'ऑपरेशन–सिंदूर' असो वा असो अमेरिकन 'टॅरिफ–वॉर'...जी घोषणा, दिल्लीतून व्हायला पाहिजे; तिच जर वॉशिंग्टनमधून व्हायला लागली; तर, त्याचा सरळ अर्थ हाच की, ''आजवरच्या स्वाभिमानी व मूलतः भारतीय–जनहिताच्या भू–राजनेतिक (Geo-Political) आंतरराष्ट्रीय–राजकारणाचा 'बळी' दिला गेलाय!''

...जग अमेरिका (नाटो) आणि सोव्हिएट रशिया (वॉर्सा करार) अशा दोन गटांत विभागले गेले असण्याच्या व त्यांच्यामधील 'शीतयुद्ध' टिपेला पोहोचलं असण्याच्या, अतिशय कठीण कालखंडात पं. जवाहरलाल नेहरुंनी युगोस्लाव्हियाचे मार्शल टिटो (रशियाच्या स्टॅलिनविरुद्ध दंड थोपटणारे), इजिप्तचे अब्दुल नासेर आणि इंडोनेशियाचे सुकार्नो यांना सोबत घेऊन मोठ्या धैर्याने 'अलिप्ततावादी चळवळ परिषद' (Non--ligned Movement...NAM) स्थापन केली. त्याद्वारे, अगदी डोळ्यात तेल घालून भारतीय–हित आजवर जपण्यात आलं; याचं कारण, ''वसाहतवादाला विरोध, आर्थिक–विषमतेला आळा घालणे, नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांचे 'सार्वभौमत्व' टिकवणे, त्यांचे आर्थिक–हितसंबंध व जागतिक शांतता राखणे''...हीच मुळी, या चळवळीची मुख्य उद्दिष्टे होती.

...आणि, आज याच महान तत्त्वांचा 'बळी' दिला जातोय; ज्यातून, 'बळी तो कानपिळी', ही जंगली स्वरुपाची 'भांडवली–मानसिकता' सर्वसामान्य भारतीय पिढ्यापिढ्यांचं अतोनात नुकसान करेल!

...शेकडो बळी देऊन '३ काळे शेतकी–कायदे' रद्द करायला लावणार्या शेतकऱ्यांवर यातून 'खुन्नस' काढला जातोय, त्यांच्यावर एकप्रकारे सूड उगवला जातोय, एवढं निश्चित!

याच सगळ्या तरतुदी गेल्यावर्षीच अमेरिकन डोन्रो अथवा ट्रोन्रो प्रणालीनुसार सुरु झालेल्या 'टॅरिफ–वॉर'च्या वेळीच स्विकारता आल्या असत्या...त्यात, आज काय मोठा फरक आहे? याचाच अर्थ, ही सगळी करामत, प्रामुख्याने गौतम अदानीवरचा अमेरिकन न्यायालयातील गुन्हेगारी दावा आणि 'एपस्टिन–फाईल्स'मुळेच घडून आलेली असावी, असं दिसतंय...''Our Prime Minister is compromised'', असं विरोधीपक्ष नेते राहुल गांधी जेव्हा म्हणतात, त्याचा अर्थ अजून वेगळा काय असू शकतो?

## भारताचे पंतप्रधान कोण...नरेंद्र मोदी की, डोनाल्ड ट्रम्प...???

अंधभक्त समाजमाध्यमांतून बोंबलत होते, बरळत होते की, ''अमेरिकन सरकारपुढे मान तुकवायला मोदींनी सपशेल नकार दिलाय''...मग, ''शेतकरी, पशुपालक आणि मच्छीमार यांच्या हिताशी ते कधिच तडजोड करणार नाहीत'', असं तारस्वरात गर्जून सांगणाऱ्या मोदींचा तो 'बनावट' स्वर, या अमेरिकन व्यापार–करारात एकदम 'म्यान' कसा झाला? डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'Executive Order'मध्ये अमेरिका तिला हवं



तेव्हा, हा करार रद्द करु शकण्याची तरतूद असल्याचं सरळ सरळ म्हटलंय...शिवाय, खनिज तेल व संरक्षण साहित्यासह 'अमेरिकन व्यापार–करारा'बाहेरच्या बाबींवरदेखील (Non-Market Policies of Third Parties etc.) अमेरिकेची कडक निगराणी व नियंत्रण रहाण्याचा छुपा इशाराही दिला गेलाय; या अशा कुठल्या गोष्टींची ना परराष्ट्र मंत्र्यांना, ना वाणिज्य–उद्योग मंत्र्यांना कुणकुण; तरीही, ट्रम्प बिनधास्त घोषणा करत सुटलेत; हे कशाचं लक्षण? किंवा, हे दोन्ही मंत्री, 'तो मी नव्हेच'मधल्या 'लखोबा लोखंडे'चा अवतार धारण करुन बसलेत?? ही कसली उच्चदर्जाची लपवाछपवी आहे??? अशातर्हेच्या करारासंदर्भात अथवा 'WTO'मधील वाटाघाटींबाबत सर्व चर्चा, पूर्वी अत्यंत खुलेपणाने व पारदर्शकपणे होत होत्या; पण, ज्यांचा राजनैतिक पायाच मुळी पूर्णतया गोबेल्स–तंत्राच्या 'खोटारडेपणा'वर आधारलेला आहे, त्यांच्याकडून कसल्या अपेक्षा करायच्या? देशाच्या परराष्ट्र मंत्र्यालाही पूर्ण अंधारात ठेवलं गेलंय, तिथे तुमची–आमची गत काय?

...ही भाजपाई–संघीय 'मीर जाफरी' अवलाद, अमेरिकन वसाहतवादाला खुलं आमंत्रण देत आहेत, जे 'ईस्ट (ब्रिटीश) इंडिया कंपनी'च्या संदर्भात घडलं; तेच, 'इंडिपेंडंट–इंडिया'च्या बाबतीत घडू पहातंय...तोच दर्दनाक इतिहास, पुन्हा नव्याने लिहीला जातोय; पण, मूळ मुद्दा हा की, ही थेरं कोणासाठी व कशासाठी चाललीयत?...नुकत्याच अमेरिकेने जारी केलेल्या भारतीय–नकाशात पाकव्याप्त काश्मीर व अक्साई चीन, हे दोन्ही प्रदेश भारताचे म्हणून दाखवलेत; या गोष्टीचं कौतुक घालायचं की, हे तथाकथित 'विश्वगुरु', भारताचा 'व्हेनेझुएला' करुनच थांबणार, असं लक्षण समजायचं?...लक्षात ठेवा, ''भारताच्या 'सार्वभौमत्वा'चा नंतर 'बळी' जाईल, प्रथम आपल्या स्वयंपूर्णतेचा 'बळी' जाईल''!

भाजपाई–संघीय 'भांडवली–विचारधारे'त वाढलेल्या व कामगारांच्या रक्ताघामाचा अतिशय 'स्वस्तात सौदा' करण्याच्या विचारधारेने पोसले गेलेल्या मुख्यमंत्र्यांनी... गुंडपुंडांना ठोकण्याच्या शिवराळ भाषेच्या माध्यमातून कामगार–संघटनांना व कामगार–पुढाऱ्यांना धमकावण्याऐवजी; थोडं आत्मचिंतन करत, कार्पोरेटीय क्षेत्रातील 'कंपनी–दहशतवादा'वर (Corporate-Terrorism) बोलण्याची व त्याविरोधात, काही कृति करण्याची हिंमत दाखवावी, असं आम्ही त्यांना 'धर्मराज्य पक्षा'तर्फे थेट आव्हान देत आहोत.

...अलिकडे दोन्ही 'इंद्र' (नरेंद्र आणि देवेंद्र) ज्यापद्धतीचे कायदे, EVMच्या कृपाशिर्वादाने लाभलेल्या राक्षसी बहुमताच्या बळावर, संसदेतून व विधिमंडळातून पारित करवून घेतायत... त्या कायद्यांमधली 'ठोकशाही' विकृतीच, मुख्यमंत्र्यांच्या मुखातून अहिल्यानगर येथील सुपा औद्योगिक वसाहतीमधील दि. ८ फेब्रुवारी–२०२६ रोजीच्या भाषणाच्या निमित्ताने दिसून आली, असं म्हणणं वावगं ठरु नये....

...याच भाषणादरम्यान बोलण्याच्या ओघात, पुढच्या पाच वर्षांत 'वीजदर' वाढणार नाहीत (सर्वसामान्य ग्राहकांची मात्र, 'Wheeling Charges'सारखे बनावट चार्जेस घेऊन व वीजेच्या वाढीव दरातून लूट चालूच ठेवणार) याची काळजी घेणारे मुख्यमंत्री, भांडवलदारांचे 'हस्तक' म्हणून...कंत्राटी–कामगार पद्धतीत अतिशय तुटपुंज्या पगारावर व डोक्यावर अनिश्चिततेची टांगती तलवार घेऊन काम करणाऱ्या त्या 'कंत्राटी–गुलामां'चे, ते तुटपुंजे पगारदेखील न वाढण्याची व भांडवलदारांची ओटी भरण्याची काळजी, घेणार असतील... हे शेंबडं पोरही सांगेल!

...अशा, आपल्या पार्श्वभागावर ...पृष्ठ क्र. ९ वर

# Trade-Deal by 'compromised' Prime Minister... ...पृष्ठ क्र. ८ वरुन

कितीही लाथा बसल्या, तरीही फाजील-उत्सवप्रियतेत, पार्टी-संस्कृतीत व धर्मसंप्रदायी-नशेत चूर असलेला कामगारवर्ग, जागा होण्याची शक्यता दूरवर कुठे दिसत नाही; हे कामगार-चळवळीचं व म्हणूनच, मराठी-माणसांचं केवढं मोठं दुर्दैव आहे!

## 'आत्मनिर्भर' नव्हे; 'ट्रम्पनिर्भर' भारत (थँक्स टू, गौतम अदानी एपिसोड अँड एपस्टिन-फाईल्स)...!!!

कधिकाळी संत तुकाराम म्हणून गेले, ''उरलो आता उपकारापुरता''...तर, आताचे 'विश्वगुरू' नावाचे आधुनिक 'नॉन बायॉलॉजिकल' (संत तुकाराम जर 'सदेह वैकुंठा'ला जाऊ शकतात; तर, आपला विश्वगुरू 'नॉन बायॉलॉजिकल' असू नाही शकत?) संतमहंत म्हणतायत, ''उरलो आता देशाला 'बाजारपेठ' बनवण्यापुरता''! मग, कुठे गेलं यांचं, 'मेक इन इंडिया'? हे प्रकरण इथेच थांबत नाही...रशिया आणि अमेरिका, या दोन विरुद्ध ध्रुवांवर 'लंबका'सारखे लोंबकळणारे हे भाजप-संघीय सरकार, भारतीयांच्या हितालाच अनिश्चिततेच्या व अनर्थाच्या दोरावर लोंबकळत ठेवू पहातंय. मुळच्या ३-४% वरुन १८%, ही सध्याची आयातकरातली वाढ, ही काय कमी आहे का आणि ती वाढदेखील ट्रम्प यांच्या मर्जीनुसार अनिश्चिततेच्या भोवर्यात अडकलेली... तरीही, अंधभक्तांना उधाण आलेलंच!

...एकीकडे अमेरिका त्यांच्याकडील भारतीय स्थलांतरितांना अत्यंत क्रूरपणे हातात बेड्या घालून हाकलतेय आणि दुसरीकडे त्यांचा 'कॉम्प्रमाईज्ड-शेतमाल' ('जनुकीय-परावर्तित' अथवा Genetically Modified...GM) मात्र, भारतात 'स्थलांतरित' करु पहातेय, हे सगळं अजबच ('खाउजा-धोरणा'च्या कालखंडातही आमच्यासारखी अनेक डावी मंडळी आग्रह धरत होती की, जागतिक-व्यापार संघटना अथवा WTOच्या माध्यमातून फक्त, वस्तुमालालाच सगळ्या देशांच्या सीमा खुल्या का करत आहात...त्यांची निर्मिती करणाऱ्या माणसांनाही खुल्या करा; म्हणजे, आपल्याकडचे 'लेकुरे उदंड झाली' असे, 'उदंड' झालेले उत्तर-भारतीय कामगार तिकडे पाठवता येतील)!

...या सगळ्याचाच अर्थ, आमच्या देशाचा पंतप्रधानच केवळ अमेरिकन-हितासाठी 'कॉम्प्रमाईज्ड' असतो, असं नव्हे; तर, देशात अमेरिकेतून आयात होणारा 'शेतमाल'ही कॉम्प्रमाईज्ड असतो! रशियाचं तेल ३०% स्वस्तात खरेदी करणाऱ्या सरकारने, त्याचा रास्त फायदा कधिच भारतीय ग्राहकांपर्यंत पोहोचवला नाहीच आणि आता अमेरिकन टॅरिफ २५% वरुन १८%पर्यंत येताना...रशियाने मधल्या काळात दिलेली दरातील सूट, आपण 'धारातिर्थी' ठेवतोय, याचंही भान त्या उधाण आलेल्या अंधभक्तांना नसावं?

...लक्षात ठेवा, या अमेरिकन भांडवलदारवर्गाला, भारत ही जगातील सगळ्यात मोठी 'लोकशाही' आहे, त्याच्याशी काडीचंही सोयरसुतक नाही; पण, भारत, ही जगातली सर्वात मोठी बाजारपेठ आहे; याचं मात्र, भयंकर आकर्षण व अप्रूप आहे!

स्वतः डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी सांगितलेला हा किस्सा आहे...जगजीवन राम जेव्हा अमेरिकन कृषि-विभागाचे नंबर २ चे अधिकारी असलेल्या डायरेक्टर जनरलना रोममध्ये भेटले; तेव्हा, त्यांनी अत्यंत उद्धटपणे केंद्रिय कृषिमंत्री जगजीवन राम यांना विचारलं, ''हे प्रथम सांगा की, तुम्ही अमेरिकन शेतमालासाठी भारतीय-बाजारपेठ कधि खुली करताय?'' जेव्हा विचारपूस करण्यात कमालीचं औधत्य जाणवलं तेव्हा, जगजीवन राम ताडकन उठले व आपल्या समोरच्या टेबलावर पडलेली कागदपत्रं त्यांच्या तोंडावर फेकून उद्गारले, ''Hell to you and your exports... India will never import from America!'' कुठे काँग्रेसचे जगजीवन राम आणि कुठे भाजपचे पियुष गोयल? ''पुढचा बैल नेटा, तर मागच्याला दाखवील वाटा'', या सुत्रानुसार रिचर्ड निक्सनना ठणकावून प्रत्युत्तर करणाऱ्या पं. इंदिरा गांधींच्या हाताखाली 'जगजीवन राम' काम करत होते; ''नरेंदर...सरेंडर''च्या हाताखाली नव्हे!

**लक्षात घ्या, तेव्हापासूनच आणि त्याही अगोदर, अमेरिकन लोकांची भारतीय बाजारपेठेवर गिधाडाची नजर होतीच! अमेरिकन शेतमालाची भारताला निर्यात सहजसुलभ व्हावी म्हणून, थेट भारताचं MSP धोरण आणि FCIच्या गोडाऊन्सच्या संरचनेवरदेखील ते प्रभाव टाकू इच्छित होते. काँग्रेसच्या लाल बहादूर शास्त्रींनी ''जय जवान, जय किसान' घोषणा देत केलेलं शेतकऱ्यांच्या हित-रक्षण महत्कार्याचं...या भाजप-संघीय लोकांनी, मूठभर भांडवलदारांच्या हितासाठी आणि 'अमेरिकन फासा'तून आपली मान सोडवून घेण्यासाठी अक्षरशः वाटोळं करायला घेतलंय. ''सब का साथ, सब का विकास'', असं दामटून खोटं 'नॅरेटिव्ह सेट' करुन २०१४ची लोकसभा-निवडणूक, या लोकांनी जिंकली खरी; पण, निवडणुकीत दिलं गेलेलं, ''एकूण शेतकी निविष्ठांसह उत्पादन-खर्चावर ५०% नफाधारित 'किमान आधारभूत किंमती'चं** (MSP...Minimum Support Price) **आश्वासन'', हे ''प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख जमा होण्यासारखंच एक 'जुमला' ठरलं''!**

काही प्रसंगीचे अपवाद वगळता, गेल्या कित्येक वर्षात कुठल्याही विदेशी करारात, आपल्या देशाने शेतमालाचा अंतर्भाव टाळलेला आहे. सध्या तर कपटनीतिने दुधाला शेतमालाच्या यादीतून अलग करण्यात आलंय आणि शेतमालाच्या व्यापाराला 'आंतरराष्ट्रीय-व्यापारा'चा अविभाज्य भाग बनवलंय, हे अत्यंत क्लेशकारक तर आहेच; पण, करोडो भारतीय शेतकऱ्यांसाठी ती 'धोक्याची घंटा' आहे...सावधान, ''शेतकऱ्यांच्या परसातली आग, थेट त्यांच्या अंथरुणाला भिडू पहातेय''!

## "Either Modi falls into disgrace or India does....''

काँग्रेसच्या काळात आपण अमेरिकेवर अधिकचा आयात-कर लावत होतो; भाजप-संघीय सरकार आल्यावर ही सगळीच व्यवस्था 'खाली डोकं, वर पाय' अशा शीर्षासनाच्या स्थितीत उभी केली गेलीय...प्रश्न आहे, त्या स्थितीत ती काळ राहू शकेल?

६ फेब्रुवारीच्या ट्रम्प-हुकूमानंतर (Executive Order) अवघ्या तीन दिवसातच अमेरिकेने आपल्या डाळींचाही भारतातील निर्यातीत समावेश (आधी फक्त, जनावरांच्या खाद्यासाठी लाल ज्वारीचाच समावेश होता) केल्याची घोषणा केलीय, हा नेमका कुठला 'आंधळी-कोशिंबिरी'चा खेळ आपण खेळतो आहोत?

**भारताचे वाणिज्य व उद्योग मंत्री, हे सध्या पत्रकार परिषदेत श्रीखंडासारखं चवीला असणारं 'पियूष' पिऊन येतात की, अन्य काही? ...की, GM अन्नपदार्थ खायला घालून भारतीय जनतेला ते 'विष' पाजू इच्छितायत?? हेच महाशय, 'उन्नीस-बीस'चा खेळ रंगवत शेजारच्या बांगलादेशावरच्या २०% अमेरिकन-टॅरिफच्या तुलनेत भारतावर २% कमी म्हणजे १८% टॅरिफ लागल्याबद्दल स्वतःचीच पाठ थोपटून घेत होते; तो पाठ थोपटणारा त्यांचा हात, जागी येण्याअगोदरच ट्रम्प यांनी बांगलादेशातील कापड-निर्यातीवर शून्य टक्के टॅरिफची घोषणा करत वाणिज्य-उद्योग मंत्र्यांचं थोबाड, त्यांच्याच हाताने फोडलंय!** याचाच अर्थ, 'There is method in the madness'', असं ट्रम्प यांच्या टॅरिफ-वॉरच्या संदर्भात बोलावं लागेल; शिवाय, ट्रम्प यांच्या हातात ''गौतम अदानी एपिसोड आणि एपस्टिन-फाईल्स'', ही दोन 'ट्रम्प-कार्ड्स' आहेतच...या सगळ्या भाजप-संघीय सत्ताधाऱ्यांना कळसुत्री-बाहुल्यांसारखं आपल्या तालावर नाचवायला! त्यातूनच, अशा 'Non-Tariff' शर्तींच्या जोखडातून अमेरिकेने आपली सुटका करवून घेतली आहे की, जी कुठल्याही देशासाठी संरक्षणात्मक 'ढाल' असते आणि आता, 'अमेरिकन स्टँडर्ड्स' आपणं मुकाट्याने मान्य करणं (म्हणजेच, आरोग्य-संस्कृतीविषयक आपला हितवादी दृष्टिकोन दूर भिरकावून देणे) किंवा 'Dumping Duries' वगैरे काढून टाकणं...या अशा 'देशघातकी' बाबींमुळे आपण ढालीविना आपण बाजारपेठीय लढाईत उतरणार आहोत. कवचकुंडलाविना जी महाभारतयुद्धात अंगराज कर्णाची अवस्था झाली, तिचं अवस्था Non-Tariff नावाची आपल्या देशाची कवचकुंडलं काढून घेतल्यामुळे होणार आहे...इथे विशेष बाब ही की, अमेरिकेचे स्वतःचे जवळपास ९ हजार 'Non-Tariff bars' आहेत आणि आपले फक्त सहाशे...स्वतःच्या Non-Tariff barriers ना जराही धक्का न लावता, हे ट्रम्प महाशय आपल्या ६०० आयात-शर्तींना सुरुंग लावतायत? म्हणजेच, भारतीय-सार्वभौमत्वाला वाकुल्या दाखवत, हा सर्व एकतर्फी खेळ चाललाय! हे सगळं आक्रित कोण घडवून आणतंय; तर, तथाकथित 'हिंदुत्ववादी' असलेले, स्वयंघोषित 'राष्ट्रवादी'वाले! प्रत्यक्षात हे खरे आहेत कोण, तर ट्रम्प यांच्या पायाशी लोळण घेणारे चक्क 'राष्ट्रद्रोही'!

## ''डोक्यावर केसाने तलवार टांगलेलीच आहे...Danger is lurking!''

''हॅलो, मारो प्रिय मित्र ट्रम्प...हू तो तारो गुलाम छू नै? मारी जग्याऐ पेलो 'राहुल गांधी' आवशे, तो तारु शुं हाल थसे?''...दिल्लीतून एक फोन वॉशिंग्टनला (व्हाईट-हाऊस) जातो; आणि, तत्काळ, मूळ कराराच्या दस्तावेजात दडून ठेवलेल्या; ज्या बाबी, एकेक करत नंतर उलगडण्यात आल्या; त्या या एका फोननंतर लागलीच मागे घेण्यात आल्यात!

डाळी, काही शेतकी-उत्पादने, डिजिटल सर्व्हिस टॅक्स आणि मुख्य म्हणजे, पुढील पाच वर्षात ५०० अब्ज डॉलर्सच्या अमेरिकन वस्तू वा उत्पादने भारताने सक्तिने आयात करण्याची मूळ अट शिथील करण्यात आल्याचं ...पृष्ठ क्र. १६ वर

**इटालियन तत्त्वज्ञ अँटोनियो ग्रामसी या तत्वज्ञाने 'हेजीमनी'चे तत्त्वज्ञान सांगितले. हेजीमनी म्हणजे, गुलामाला आपल्या गुलामीची जाणीव न होता, त्या गुलामीच्या पिंजऱ्यात सुरक्षितता वाटणे, असे म्हणता येईल. उदाहरणार्थ आपल्या कुटुंबसंस्थेने स्त्रियांवर संस्कृती–रक्षणाच्या नावावर अशाप्रकारे बंधने घातली आहेत की, त्या बंधनाच्या पिंजऱ्यातच त्या स्त्रियांना सुरक्षितता वाटू लागते, त्याचवेळी संस्कृतीरक्षण केल्याचा अभिमानही वाटतो. ही हेजीमनी नुसतीच सांस्कृतिक नसते; तर, ती सामाजिक आणि राजकीयसुद्धा असते. याविषयी चर्चा करणारा जगदीश काबरे यांचा लेख...**

# ग्रामसीचे 'हेजीमनी' तत्त्व आणि हिंदुत्व

**...जगदीश काबरे**

**इतिहासात काही विचारवंत असे असतात, जे केवळ तत्त्वज्ञान मांडत नाहीत; तर, समाजाची अंतर्गत रचना उघड करत असतात. ते सत्ता कशी टिकते, समाज कसा घडतो आणि लोकांच्या मनावर नियंत्रण कसे मिळवले जाते याचे असे विश्लेषण करतात की, त्यांचे विचार जगभरातील राजकारण समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरतात. इटालियन मार्क्सवादी विचारवंत अँटोनियो ग्रामसी हे अशाच विचारवंतांपैकी एक होते. ग्रामसीचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी सत्तेला फक्त सरकार, पोलीस, सैन्य, कायदे या चौकटीत पाहिले नाही. त्यांनी सत्ता लोकांच्या मनात कशी रुजते, लोक ती सत्ता ''स्वाभाविक'' कशी मानू लागतात आणि सत्ता टिकवण्यासाठी एखाद्या विचारसरणीचा वापर कसा होतो, याचा सूक्ष्म अभ्यास केला. याच अभ्यासातून त्यांनी ''हेजीमनी'' (hegemony) ही संकल्पना विकसित केली. ''हेजीमनी'' म्हणजे ''सहमती आधारित वैचारिक, सांस्कृतिक वर्चस्व'' स्थापित करणे,**

ग्रामसीच्या जीवनाचा मोठा भाग तुरुंगात गेला. इटलीतील फॅसिस्ट हुकूमशहा बेनिटो मुसोलिनीने, ग्रामसीला १९२६ मध्ये तुरुंगात टाकले. कारण, ग्रामसी हा मार्क्सवादी कम्युनिस्ट चळवळीचा नेता होता, संसद सदस्य होता आणि कामगार संघटनांचा वैचारिक आधार होता. मुसोलिनीला ग्रामसीच्या विचारशील मेंदूची भीती वाटत होती. म्हणूनच, न्यायालयात सरकारी वकिलाने ''या माणसाचा मेंदू वीस वर्षे काम करणे थांबवायला हवा'' असे निर्लज्जपणे म्हटले होते. ही वाक्ये फॅसिझमचे मूळ स्वरूप सांगतात; ते म्हणजे, विरोधकाला मारायचे नसते तर त्याचा विचारच मारायचा असतो. परंतु ग्रामसी तुरुंगात खचला नाही. उलट तुरुंगातील अंधारात त्याने विचारांची मशाल पेटवली. त्याने तुरुंगात लिहिलेल्या नोंदी पुढे ''तुरुंगातील नोंदी'' (Prison Notebooks) म्हणून प्रसिद्ध झाल्या. त्या नोंदींमध्ये त्याने सत्तेचे असे विश्लेषण केले, जे आजही जगभरातील राजकारण समजून घेण्यासाठी वापरले जाते. विशेषतः भारतात आज जे घडते आहे–धर्माधारित राजकारण, बहुसंख्यवादी अस्मितेचा उदय, विरोधकांचे दमन, माध्यमांचे नियंत्रण, इतिहासाचे पुनर्लेखन, आणि सामान्य माणसाच्या मनात भीती पेरून सत्ता मिळवणे. हे सर्व समजून घेण्यासाठी ग्रामसीचे विचार फार महत्त्वाचे ठरतात.

**ग्रामसीने सांगितले होते की, समाजात सत्ता दोन प्रकारची असते. एक म्हणजे प्रत्यक्ष सत्ता जी सरकार, कायदे, पोलीस, सैन्य, न्यायालये यांद्वारे वापरली जाते. ही सत्ता उघड असते. पण, दुसरी सत्ता अधिक धोकादायक असते, ती म्हणजे अप्रत्यक्ष सत्ता. ही सत्ता लोकांच्या मनावर गाजवली जाते. ती लोकांच्या विचारात, त्यांच्या सामान्य शहाणपणात, त्यांच्या नैतिकतेत आणि त्यांच्या जगाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात असते. लोक जेव्हा एखादी विचारसरणी ''हे तर अगदी स्वाभाविक आहे'' असे मानू लागतात, तेव्हा ती सत्ता खरी हेजीमनी बनते.** मग सरकारला वारंवार बंदूक उगारावी लागत नाही. कारण, लोक स्वतःहून त्या विचाराला स्वीकारतात. या अर्थाने हेजीमनी म्हणजे फक्त सत्ता लादणे नाही; तर, लोकांची संमती मिळवून सहमतीने सत्ता वापरणे होय. लोकांना असे वाटायला लावणे की, सत्ताधारी गटाचा विचारच योग्य आहे, तोच नैतिक आहे, तोच देशहिताचा आहे. हे लोकांच्या मनात रुजवण्यासाठी शाळा, कॉलेज, धर्मसंस्था, माध्यमे, चित्रपट, साहित्य, संस्कृती, सामाजिक परंपरा, सण–उत्सव, ही सर्व माध्यमे वापरली जातात. ग्रामसी म्हणतो की सत्ता टिकवण्यासाठी राज्ययंत्रणा जितकी महत्त्वाची आहे, तितकीच महत्त्वाची आहे ''सिव्हिल सोसायटी''. सिव्हिल सोसायटी म्हणजे, समाजातील अशा संस्था की, ज्या लोकांच्या विचारांना आकार देतात. शिक्षक, पत्रकार, धार्मिक गुरु, कलाकार, लेखक, प्रवचनकार, विशिष्ट विचारसरणीच्या संघटना, हे सगळे समाजाच्या मानसिकतेवर प्रभाव टाकणारे या प्रकारात मोडतात आणि म्हणूनच हेजीमनी ही फक्त निवडणुकीच्या मैदानात लढली जाणारी लढाई नसून, ती माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवणारी लढाई आहे.



भारताच्या संदर्भात पाहिले तर, हिंदुत्ववादी राजकारणाने गेल्या अनेक दशकांत नेमके हेच केले आहे. त्यांनी प्रथम सत्ता मिळवण्याआधी समाजाच्या मनात काही कथा पेरल्या, काही भीती रुजवल्या, काही शत्रू उभे केले आणि काही मिथके निर्माण केली. ''हिंदू एकत्र नाहीत'', ''हिंदूंचे अस्तित्व धोक्यात आहे'', ''मुस्लिम म्हणजे शत्रू'', ''मुस्लिमांनी इतिहासात हिंदूंवर अत्याचार केले'', ''हिंदू संस्कृती नष्ट करण्याचे कट सुरू आहेत''. अशा कल्पना अचानक निर्माण झालेल्या नाहीत; तर, त्या अनेक दशकांच्या प्रयत्नांतून तयार झाल्या आहेत. हे प्रयत्न फक्त राजकीय भाषणांतून केले गेले नाहीत; तर, शाळेतील इतिहास पुस्तकांपासून ते धार्मिक प्रवचनांपर्यंत, टीव्ही मालिकांपासून ते व्हॉट्सॲप मेसेजपर्यंत, गावातील कीर्तनापासून ते शहरातील सोशल मीडिया ट्रेंडपर्यंत, अशा सर्व स्तरांवर झाले आहेत. याच ठिकाणी ग्रामसीची हेजीमनी संकल्पना आपल्याला अधिक स्पष्टपणे दिसते. कारण, हिंदुत्ववादी विचारसरणीने मुस्लिमांविषयीचा द्वेष उघडपणे ''द्वेष'' म्हणून मांडलेला नाही. तो ''सुरक्षा'', ''राष्ट्रवाद'', ''संस्कृती रक्षण'', ''देशभक्ती'', ''बहुसंख्यांचा हक्क'' अशा शर्कराअवगुंठित शब्दांत घोळून मांडला आहे. त्यामुळे सामान्य माणूस स्वतःला द्वेषी समजत नाही. तो स्वतःला ''देश वाचवणारा'' समजतो. तो स्वतःला ''इतिहास काळात झालेल्या अन्यायाचा बदला घेणारा'' समजतो. तो स्वतःला ''संस्कृतीचा रक्षक'' समजतो. हेच हेजीमनीचे खरे स्वरूप आहे. **द्वेषाला नैतिकतेचे रूप देणे, अन्यायाला न्यायाचे रूप देणे आणि भेदभावाला राष्ट्रहिताचे रूप देणे, हा हेजीमनीचा सर्वात प्रभावी डाव असतो. आज भारतात अनेक ठिकाणी मुस्लिमांविषयी संशय, भीती आणि तिरस्कार हा इतका सामान्य झाला आहे की, तो लोकांना चुकीचा वाटतच नाही. तो उपहासात येतो, चर्चेत येतो, बातम्यांमध्ये येतो, धार्मिक प्रवचनांत येतो, निवडणुकीच्या भाषणांत येतो आणि घरातील संवादांतही येतो. जेव्हा समाजातील मोठा वर्ग एखाद्या समुदायाला ''परका'' मानतो, तेव्हा त्या समुदायावर अन्याय करणेही समाजाला ''स्वाभाविक'' वाटू लागते. हीच हेजीमनीची खरी ताकद आहे. कारण, ती माणसाच्या मनाला बदलते आणि मन बदलले की, राजकारण आपोआप बदलते.**

ग्रामसीने ''कॉमन सेन्स'' म्हणजेच, सामान्य बुद्धीवर विशेष भर दिला आहे. सामान्य बुद्धी म्हणजे, लोकांच्या रोजच्या अनुभवातून तयार झालेल्या धारणांचा संग्रह यात वैज्ञानिक तर्क नसतो, पुरावा नसतो; ....पृष्ठ क्र. ११ वर

# ग्रामसीचे ‘हेजीमनी’ तत्त्व आणि हिंदुत्व

...पृष्ठ क्र. १० वरुन

पण, भावना असतात, परंपरा असतात आणि समाजाने सांगितलेली तथाकथित ‘‘सत्ये’’ असतात. पण; खरे तर, तो सत्यापलाप असतो. हिंदुत्ववादी राजकारणाने या सामान्य बुद्धीवर नेमके काम केले. उदाहरणार्थ, मुस्लिम लोक जास्त मुलं जन्माला घालतात त्यामुळे ते एक दिवस भारतावर ताबा मिळवतील. ही अफवा वैज्ञानिकदृष्ट्या खोटी आहे; पण, ती अनेक लोकांच्या मनात ‘‘सामान्य सत्य’’ म्हणून रुजवली गेली आहे. ‘‘लव्ह जिहाद’’ ही संकल्पना पुराव्याशिवाय निर्माण केली गेली. पण, ती लोकांच्या मनात इतकी रुजलीय की, तिच्या नावाखाली हिंसा घडतेय. हे सगळे हेजीमनीच्या प्रक्रियेतून घडते.

हेजीमनीचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे, इतिहासाचे नियंत्रण, ग्रामसी म्हणतो की, इतिहास म्हणजे फक्त भूतकाळ नाही; तर, तो वर्तमानावर सत्ता मिळवण्याचे साधन आहे. हिंदुत्ववादी राजकारणाने इतिहासाचा वापर एकरेषीय पद्धतीने केला. इतिहासाला त्यांनी ‘‘हिंदू विरुद्ध मुस्लिम’’ या एका चौकटीत बंदिस्त केले. इतिहासात सहअस्तित्व होते, सांस्कृतिक देवाणघेवाण होती, वर्गसंघर्ष होते, जातीसंघर्ष होते, प्रादेशिक सत्ता संघर्ष होते. पण, हे सर्व बाजूला सारून इतिहासाला केवळ धार्मिकद्वेषाचे पाठ्यपुस्तक बनवले गेले. त्यामुळे आजचा सामान्य माणूस वर्तमानातील समस्यांचे उत्तर इतिहासातील सूडात शोधू लागतो. हे हेजीमनीचे सर्वांत घातक स्वरूप आहे, कारण, ते वर्तमानाच्या प्रश्नांवर पडदा टाकते. ग्रामसीने सांगितले की, प्रभुत्वशाली वर्ग फक्त सत्ता गाजवत नाही, तर नैतिक आणि वैचारिक नेतृत्वही करतो. म्हणजे तो लोकांना असे वाटायला लावतो की, ‘‘आम्हीच योग्य आहोत, आम्हीच देश वाचवतो.’’ हिंदुत्ववादी राजकारणाने हे नैतिक नेतृत्व मिळवण्याचा प्रयत्न केला आणि त्यात ते यशस्वी झाले, हे खेदाने नमूद करावेसे वाटते. म्हणून ‘‘आम्ही राष्ट्रवादी आहोत, बाकीचे राष्ट्रद्रोही आहेत’’ अशी भाषा समाजात सामान्य झाली. ‘‘आम्ही संस्कृती वाचवतो, बाकीचे संस्कृतीद्रोही आहेत’’ अशी मानसिकता तयार झाली. यातून विरोधी विचारसरणीला समाजाच्या नजरेत संशयास्पद बनवण्यात आले. धर्मनिरपेक्षता, समता, विवेकवाद,

**संविधानिक मूल्ये, यांना ‘‘पाश्चात्त्य’’, ‘‘नास्तिक’’, ‘‘देशविरोधी’’ ठरवण्याचा प्रयत्न झाला. असे करणे म्हणजे, विरोधकाच्या विचारांना समाजात स्थानच मिळू न देणारी ही रणनीती आहे. ग्रामसीच्या भाषेत सांगायचे तर, ही सांस्कृतिक दडपशाही आहे.**

तसेच, आजच्या काळात या हेजीमनीला सर्वात मोठा हातभार लावला आहे, तो माध्यमांनी आणि सोशल मीडियाने. माध्यमे जर सतत एका विशिष्ट विचारसरणीची भाषा वापरत असतील, विशिष्ट विषयांवरच चर्चा करत असतील आणि विशिष्ट समुदायाला सतत संशयाच्या चौकटीत बंदिस्त करत असतील; तर, समाजाची सामान्य बुद्धी बदलते. सोशल मीडियावर तर अफवा, खोटी माहिती आणि भावनिक प्रचार यांचा वेग इतका मोठा आहे की, लोकांना त्यातील खराखोटा तपशील तपासायला वेळच मिळत नाही. ग्रामसीने आपल्या काळात सोशल मीडिया पाहिला नाही; पण, त्याने सांगितलेला ‘‘सांस्कृतिक युद्ध’’ हा सिद्धांत आजच्या डिजिटल जगात अधिक अचूकपणे लागू पडतो. म्हणून, आजची लढाई निवडणुकीत जितकी महत्वाची आहे, तितकीच ती फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये, यूट्यूब चॅनेलमध्ये, टीव्ही डिबेटमध्ये आणि ट्रेंडमध्येही महत्त्वाची आहे.

याच प्रक्रियेतून हिंदुत्ववादी राजकारणाने सत्तेच्या महत्त्वाच्या जागांवर आपली माणसे बसवली. शैक्षणिक संस्थांचे प्रमुख, संशोधन संस्थांचे संचालक, सांस्कृतिक अकादम्या, प्रसारमाध्यमे, प्रशासकीय यंत्रणा, या सर्व ठिकाणी एका विशिष्ट विचारसरणीला अनुकूल वातावरण तयार झाले. **हे फक्त ‘‘सत्ता मिळाली म्हणून’’ झाले नाही; तर, सत्ता टिकवण्यासाठी आवश्यक असलेल्या हेजीमनीचे हे पुढचे पाऊल होते. ग्रामसी म्हणतो की, राज्यसत्ता जिंकणे म्हणजे, अंतिमण विजय नाही; खरा विजय म्हणजे समाजाच्या मनावर नियंत्रण मिळवणे आणि जर समाजाचे मन आपल्या बाजूने झाले; तर, लोकशाहीच्या संस्थादेखील हळूहळू पोकळ होतात. ज्या पद्धतीने आज सगळ्या स्वायत्त संस्था या सत्तेच्या अधीन झालेल्या**



**पहातो आहोत त्यावरून आपण समजू शकतो. त्यामुळेच अनेक विचारवंतांना आज असे वाटतेय की, भारतातील लोकशाही ‘‘व्हेंटिलेटरवर’’ आहे. या परिस्थितीत प्रश्न पडतो की, हिंदुत्ववादी हेजीमनीला उत्तर कसे द्यायचे? ग्रामसीचा सर्वात महत्त्वाचा संदेश इथे लागू होतो.**

ग्रामसी म्हणतो की, या प्रस्थापित हेजीमनीला मोडण्यासाठी फक्त एखादे आंदोलन पुरेसे नाही. फक्त निवडणूकीत हरवणे किंवा जिंकणे पुरेसे नाही. कारण, हेजीमनी ही दीर्घकाळ चालणारी सांस्कृतिक प्रक्रिया असते. तिचा मुकाबला करायचा असेल, तर तितकीच दीर्घकालीन प्रतिहेजीमनी उभी करावी लागते; म्हणजेच, समाजाच्या सामान्य बुद्धीत पर्यायी मूल्ये रुजवावी लागतात.

या प्रतिहेजीमनीचे पहिले पाऊल म्हणजे, इतिहासावर हिंदुत्वाने केलेली मक्तेदारी मोडणे. इतिहासाचा अर्थ सूड नसून समज आहे, हे समाजाला पटवून देणे गरजेचे आहे. दुसरे पाऊल म्हणजे, धर्मद्वेषाच्या भाषेऐवजी लोकांच्या वास्तविक समस्यांवर लक्ष केंद्रित करणे. बेरोजगारी, महागाई, शिक्षण, आरोग्य, शेतकरी संकट, या मुद्द्यांना धार्मिकद्वेषाचा पडदा कसा झाकतो, हे लोकांच्या अनुभवांशी जोडून दाखवावे लागते. तिसरे पाऊल म्हणजे, सिव्हिल सोसायटीमध्ये सक्रिय काम करणे. शिक्षक, लेखक, कलाकार, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांनी सातत्याने संविधानिक मूल्यांची भाषा समाजात रुजवावी लागते. ग्रामसी ज्यांना ‘‘ऑर्गेनिक इंटेलेक्च्युअल्स’’ म्हणतो, असे लोक समाजातून उभे राहिले तरच हा बदल शक्य होतो. चौथे पाऊल म्हणजे, नैतिक नेतृत्व निर्माण करणे. पुरोगामी विचारसरणीने नेहमी बचावात्मक भूमिका घेतली तर, तो कधीच समाजाला आकर्षित करू शकणार नाही. तिला स्वतःची नैतिक भाषा ठामपणे मांडावी लागेल. संविधान, समता, विवेकवाद, स्त्रीपुरुष समानता, जातिविरोध ही मूल्ये भारतीय समाजातील संघर्षांतून जन्मलेली आहेत, हे स्पष्टपणे सांगावे लागेल. जेव्हा लोकांना जाणवेल की, मानवी प्रतिष्ठेचा आणि न्यायाचा विचारही ‘‘राष्ट्रद्रोह’’ नाही; तर, खरा राष्ट्रधर्म आहे, तेव्हाच प्रस्थापित हेजीमनीचे कवच फुटू लागते. शेवटी ग्रामसी आपल्याला सांगतो की, हा संघर्ष क्षणिक हल्ल्याचे युद्ध नाही; तर, दीर्घकालीन चालणारे युद्ध आहे. म्हणजेच हा लढा संयमाने, सातत्याने आणि सांस्कृतिक पातळीवर लढावा लागेल. लोकांच्या मनात रुजलेली भीती, द्वेष आणि मिथके एका दिवसात नष्ट होणार नाहीत; पण, त्यांना पर्यायी कथा दिल्या, पर्यायी अनुभव दिले आणि मानवी सहवेदना जागवली; तर, हिंदुत्ववादी हेजीमनी हळूहळू कमकुवत होईल.

अँटोनियो ग्रामसीला मुसोलिनीने तुरुंगात टाकले; कारण, ग्रामसीचे विचार सत्तेला धोकादायक होते. आज भारतातही परिस्थिती काही प्रमाणात तशीच आहे. सत्तेला विरोध करणाऱ्या विचारवंतांवर, कार्यकर्त्यांवर देशद्रोहाचे कलम लावून तुरुंगात डांबले जाते आहे आणि वर्षानुवर्षे त्यांचे आयुष्य सडवले जाते आहे. सत्ता ज्या वेळी विचारांना घाबरते, त्या वेळी ती माध्यमे नियंत्रित करते, इतिहास बदलते, विरोधकांना देशद्रोही ठरवते आणि समाजाला धार्मिक भीतीत गुंतवत; पण, ग्रामसीने तुरुंगात बसून दाखवून दिले की, विचार बंदिस्त करता येत नाहीत. विचार हे असे शस्त्र आहे की, जे समाजाच्या मनात घर करून बसले तर, ते सत्तेच्या सर्व किल्ल्यांना आतून पोखरते. म्हणूनच आज, हिंदुत्ववादी हेजीमनी समजून घेण्यासाठी ग्रामसीचे तत्त्वज्ञान समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. कारण, ही लढाई माणसाच्या मनाला बदलणारी आहे. ती भाषेत आहे, ती इतिहासात आहे. ती प्रतीकांमध्ये आहे आणि ती ‘‘हे तर स्वाभाविकच आहे.’’ असे समाजाला वाटायला लावणाऱ्या वाक्यातही आहे. जर हे ‘‘स्वाभाविक’’ प्रश्नांकित करता आले; तरच, समाज मुक्त होऊ शकतो. म्हणूनच आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, हिंदुत्ववादी हेजीमनीची सत्ता मोडायची असेल; तर, आधी समाजाचे मन जिंकावे लागेल. नवीन पर्यायांची प्रतीहेजीमनी लोकांच्या मनावर बिंबवावी लागेल. पुरोगाम्यांनी याची सुरुवात आतापासूनच केली तरच, पुढच्या पिढ्यांमध्ये बदल दिसू लागतील.

...विजय चोरमारे



# गोविंद पानसरे : डोंगराला भिडणारा म्हातारा

घटना २००४च्या मे महिन्यातली आहे. करवीर पीठाचे शंकराचार्य विद्याशंकर भारती निवृत्त होऊन, त्यांच्याजागी श्री विद्यानृसिंहभारती हे सूत्रे घेणार होते. त्यानमित्त आयोजित केलेल्या समारंभासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन सरसंघचालक के. सुदर्शन उपस्थित होते. यावेळी शंकराचार्यांनी भाषणात, ‘लोकशाही ही या देशातली अंतिम व्यवस्था नसल्याचे’ म्हटले होते. स्वाध्याय आणि संस्कारांवर आधारित, नवी घटना देशासाठी लिहिण्याची गरज असल्याचे तारेही मावळत्या शंकराचार्यांनी तोडले होते. समारंभाला सरसंघचालक पाहुणे असल्यामुळे शंकराचार्यांच्या भाषणाकडे कुणाचे लक्ष नव्हते. मी तेव्हा लोकमतमध्ये काम करीत होतो. मला शंकराचार्यांच्या भाषणाचे गांभीर्य जाणवले होते. त्यावर ‘शाहूंच्या भूमीत परिवर्तनाचे चक्र उलटे फिरवण्याचा प्रयत्न’ असे वृत्तविश्लेषण लिहिले. त्याचा समारोप करताना असे म्हटले होते की, ‘कृष्णाकाठी कुंडल आता पहिले उरले नाही, त्याप्रमाणे कोल्हापूरच्या भूमीतली धगही पूर्वीसारखी राहिलेली नाही. त्यामुळेच शंकराचार्य असे घटनाविरोधी विधान करायला धजावतात’ वगैरे.

त्यादिवशी भल्या सकाळी पानसरे अण्णांचा फोन आला. म्हणाले, तू लिहिलं आहेस, ते बरोबर आहे. पूर्वी एकत्र लढणारी सगळी मंडळी निवडणुकीचं राजकारण आणि इतर काही कारणांमुळं असेल; पण, वेगळी झाली आहेत. पुरोगामी मंडळींची एकजूट राहिलेली नाही. तरीसुद्धा ही चांगली संधी आहे, पुन्हा सगळ्यांना एकत्र आणण्याची. प्रयत्न करूया. काही अवघड वाटत नाही मला

माझ्यासारख्या पत्रकाराला हेच अपेक्षित होतं. मी जे लिहिलं होतं, त्याचा आशय फक्त पानसरे अण्णाच समजून घेऊ शकतात, याची मला खात्री होती. त्यानुसार पुढचं सगळं घडत गेलं. अण्णांनी पुढाकार घेऊन माजी आमदार बाबूराव धारवाडे, शेकापचे प्रा. विष्णूपंत इंगवले, काँग्रेसचे महादेवराव आडगुळे, माजी महापौर भिकशेठ पाटील, माकपचे चंद्रकांत यादव अशी सगळी मंडळी एकत्र आणली, म्हणजे, मधल्या काळात विस्कळित झालेल्या सगळ्या लोकांची मोट बांधली. कोल्हापूर शहरात शंकराचार्यांच्याविरोधात रान उठवलं. आठवडाभर कोपरा सभा घेतल्या. शेवटी एक मोठ्ठा मोर्चा शंकराचार्य मठावर काढला. त्यासाठी पुण्याहून भाई वैद्य वगैरे मंडळीही आली होती. मोर्चा सुरू होण्याच्या थोडावेळ आधी भवानी मंडपात पानसरे अण्णांसोबत काही प्रमुख कार्यकर्ते मंडळी गप्पा मारत होती, तिथं मी पोहोचलो. तेव्हा माझ्याकडं निर्देश करून अण्णा सगळ्यांना म्हणाले, ‘आज इथं जे काही आपण जमलो आहोत, त्याला हा कारणीभूत आहे कुणीतरी डिवचल्याशिवाय आपल्याला राग येत नाही. यानं ते बरोबर केलं.’

**शंकराचार्यांच्या घटनाविरोधी वक्तव्याच्या विरोधात आंदोलन त्यांनीच संघटीत केलं; परंतु, आपल्या सर्व सहकारी मित्रांपुढं त्यांनी जाहीरपणे त्याचं श्रेय मला देऊन टाकलं. सार्वजनिक व्यवहारातला हा दुर्मीळ पारदर्शीपणा आहे.**

पानसरेअण्णांचं वैशिष्ट्य म्हणजे, ते कम्युनिस्ट पुढारी असले तरी, कम्युनिस्टांसारखे सतत कारवादलेले किंवा वैतागल्यासारखे नसत. त्यांचं कामाचं आणि आस्थेचं क्षेत्र



पक्षाच्या वर्तुळापुरतं मर्यादित नव्हतं. जातीयवादी–पक्ष आणि संघटनांच्या संदर्भात त्यांची भूमिका अगदीच ठाम आणि स्पष्ट होती. सगळ्या पुरोगामी घटकांनी त्याविरोधात एकत्र लढायला पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा. आपसातले किरकोळ मतभेद बाजूला ठेवून एकत्र यायला पाहिजे, असं ते म्हणायचे. केवळ म्हणून थांबायचे नाहीत; तर, त्यासाठी वेळोवेळी पुढाकार घ्यायचेत.

सगळ्यांना एकत्र आणण्यासाठी पक्षाचा रंग अडचणीचा ठरतो, असं लक्षात आल्यावर; ते पक्ष, झेंडा, लाल रंग सगळं बाजूला ठेवून वेगळाच मंच घेऊन पुढं आले. कोल्हापुरात स्थापन झालेले ‘आम्ही भारतीय लोकआंदोलन’ हा असाच एक प्रयत्न होता. बाबरी मशीद पाडल्यानंतरच्या काळात आम्ही भारतीय लोकआंदोलन अस्तित्वात आलं आणि वेळोवेळी त्या बॅनरखाली सगळे पुरोगामी घटक पक्ष–संघटनांचे झेंडे बाजूला ठेवून एकत्र आले.

**श्रमिक प्रतिष्ठान हा आणखी एक असाच प्रयत्न होता. कामगार–कष्टकरीवर्गाच्या श्रमाच्या पैशातून त्यांनी श्रमिक प्रतिष्ठानची उभारणी केली आणि सांस्कृतिक मंच असं त्याचं स्वरुप ठेवलं. त्यामागंही त्यांची दूरदृष्टी होती. पक्षात कार्यकर्ते सक्रीय होते, विविध थरांतले कष्टकरी घटक होते. मूलभूत प्रश्नांसाठीच्या त्यांच्या लढाया सुरू असायच्या. कुठलंही सत्तेचं पद मिळणार नाही, याची खात्री असतानाही त्यांनी कधी हताशेचा सूर काढला नाही किंवा लढाई थांबवली नाही. या प्रवासात त्यांच्या लक्षात आले की, पूर्वी डाव्या चळवळीत कवी, गीतकार, चित्रकार, साहित्यिक अशी वेगवेगळी कलावंत मंडळी असायची. आज अशा लोकांची वानवा आहे. कैफी आजमी, नारायण सुर्वे यांची उदाहरणं किती काळ देत बसायचं?** नवी मंडळी तयार झाली पाहिजेत. श्रमिक प्रतिष्ठानच्या कार्याची दिशा त्यांनी तशी ठेवली. कार्यकर्त्यांचं सांस्कृतिक आकलन वाढलं पाहिजे, वेगवेगळ्या क्षेत्रातल्या कलावंत मंडळींनी चळवळीशी जोडून घेतलं पाहिजे, यादृष्टीनं काम केलं. काव्यलेखन कार्यशाळा घेतली. स्वतःच्या अमृतमहोत्सवानिमित्त कोल्हापूर आणि महाराष्ट्राच्या जडणघडणीत योगदान दिलेल्या लोकांच्या चरित्रपुस्तिका लिहून घेतल्या, जेणेकरून त्या माणसांचं काम नव्या पिढीपुढं यावं. हे करताना त्यांच्या लक्षात आलं की, चांगले मुद्रितशोधक नाहीत; तर, त्यांनी त्यासाठीची कार्यशाळा घेतली. खरंतर मराठी भाषा, शुद्धलेखन, व्याकरण हे काही त्यांचे विषय नव्हते. मात्र, अण्णांना कुठल्या क्षेत्राचं वावडं नव्हतं. याचा अर्थ, ते सगळ्या क्षेत्रात लुडबूड करायचे असा नव्हे. नेते असूनही ते सतत कार्यकर्त्याच्या भूमिकेत असायचे. स्थानिक पातळीवरील त्या त्या क्षेत्रातल्या जाणत्या मंडळींना मोठेपणा देऊन काम करायचे. सामान्य कार्यकर्त्यांना मंचावर संधी द्यायचे. अवि पानसरे स्मृती व्याख्यानमालेत नव्या कार्यकर्त्यांना स्वागत–प्रास्ताविक, पाहुण्यांची ओळख आणि आभार मानण्याची संधी द्यायचे. मंचावर बोलण्यासाठी कार्यकर्ते तयार व्हावेत, असा त्यामागचा त्यांचा हेतू होता.

महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीत कोल्हापूरचे नेतृत्व फारसे ठळकपणे दिसत नाही. रत्नाप्पा कुंभार, बाळासाहेब देसाई अशी नावे चटकन लक्षात येतात. सत्तेच्या राजकारणात कोल्हापूर पिछाडीवर असले तरी, प्रबोधनाच्या चळवळीसाठी मात्र, कोल्हापूरने सातत्याने महाराष्ट्राला नेतृत्व दिले. राजर्षी शाहू महाराज, भाई माधवराव बागल, कॉम्रेड संतराम पाटील, कॉम्रेड यशवंत चव्हाण, प्रा. एन. डी. पाटील, कॉम्रेड गोविंदराव पानसरे, राजू शेट्टी या नावांवर नजर टाकली तरी, प्रबोधनाच्या चळवळीसाठी, कष्टकऱ्यांच्या लढाईसाठी कोल्हापूरने महाराष्ट्राला काय दिले आहे, याची कल्पना येते.

वयाची अमृतमहोत्सवी वाटचाल केलेल्या पानसरेअण्णांच्या आयुष्यातील सहा दशके कोल्हापुरात गेली. अहमदनगर जिल्ह्यातील कोल्हार हे त्यांचे गाव. कोल्हार ते कोल्हापूर असा त्यांचा विलक्षण प्रवास आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेले अण्णा, पंधराव्या वर्षी पत्की गुरुजींच्याबरोबर अंगावरच्या कपड्यानिशी कोल्हापूरला आले. सुरुवातीच्या काळात कधी बिंदू चौकात कम्युनिस्ट पुस्तकांची विक्री करणाऱ्या दुकानात; तर, कधी फुले आणि आंबेडकरांच्या पुतळ्याच्या पुतळ्याखाली झोपून त्यांनी रात्री काढल्या. पुढे प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसमध्ये प्रवेश मिळाला आणि त्यांची शिक्षणाची गाडी रुळावर आली. शिक्षण घेत असतानाच, अनेक लढे आणि चळवळींमध्ये त्यांनी भाग घेतला.

सोपे बोलणे आणि सोपे लिहिणे हे त्यांचे वैशिष्ट्य. कामगारांपुढे बोलताना कधी ते चीन, रशियाच्या बाता मारीत नसत. कितीही अवघड विषय असला तरी, त्यांना समजेल अशा भाषेत त्यांच्याशी संवाद साधतच मांडणी करत. कार्यकर्त्यांपुढे बोलताना मात्र, काही जागा मुद्दाम रिकाम्या ठेवण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्याबद्दल ते म्हणायचे, ‘कार्यकर्त्यांना प्रश्न पडले पाहिजेत, त्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत, त्यासाठी अशा काही जागा मुद्दाम रिकाम्या ठेवायच्या असतात.’

जागतिकीकरणाचे वारे वाहू लागल्यानंतर, यासंदर्भातील एकूण चर्चेमध्ये त्यांनी ‘खाऊजा धोरण’ हा नवा शब्द दिला. ‘खाऊजा’ म्हणजे खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण.

अण्णांचा मुलगा अविनाशचा २००३मध्ये अकस्मात मृत्यू झाला. अविनाश डाव्या चळवळीत सक्रीय होता. तरुण नेत्याच्या मृत्युमुळे सगळेच हादरून गेले होते. अविनाशची अंत्ययात्रा बिंदू चौकातील ‘रेड फ्लॅग बिल्डिंग’जवळ आली, तेव्हा सन्नाटा पसरला. काय करायचे कुणालाच कळेना, अशावेळी ७० वर्षांचे अण्णा पार्थिव असलेल्या गाडीवर चढले आणि पक्षाचा झेंडा अविनाशच्या पार्थिवावर अंथरून आपली मूठ आवळली. ‘अविनाश पानसरे – लाल सलाम’ असे म्हणून ‘अविनाश का अधुरा काम कौन करेगा?’ – अशी घोषणा दिली आणि पाठीमागून शेकडो लोकांनी ‘हम करेंगे, हम करेंगे.’ असा प्रतिसाद दिला. उपस्थितांच्या अंगावर काटा आला आणि अनेकांच्या गळ्यात हुंदका दाटून आला.

**अण्णा किती धीरोदात्त होते, याचे उदाहरण म्हणून या घटनेकडे पाहता येते. व्यक्तिगत आयुष्यात आणि सार्वजनिक जीवनातील...****पृष्ठ क्र. १३ वर**

## गोविंद पानसरे : डोंगराला भिडणारा म्हातारा ...पृष्ठ क्र. १२ वरुन

**वाटचालीत, अशा धीरोदात्तपणाबरोबरच खंबीरपणा आणि व्यावहारिक शहाणपणाचे दर्शन त्यांनी अनेकदा घडवले. त्याचमुळे डाव्या चळवळीचे संख्याबळ घटत गेले; तरी, चळवळीची ताकद कमी झाली असे कधी जाणवले नाही.**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावावर राजकीय दुकानदारी आणि धार्मिक विद्वेष पसरवण्याचे उद्योग जोरदारपणे सुरू झाले, तेव्हा पानसरे अण्णांसारख्या लोकशिक्षकाने ते मूकपणे पाहणे शक्य नव्हते. जातीयवादी राजकारण करणाऱ्या शिवसेना आणि तत्सम पक्ष–संघटनांच्या विरोधात, त्यांनी अनेक सभांमधून तोफा डागल्या आहेत. परंतु ते तेवढ्यावरच थांबले नाहीत. शिवाजी महाराजांच्यावर त्यांनी एक पुस्तिका लिहिली. ‘शिवाजी कोण होता ?’ ही पुस्तिका शिवरायांनी सामान्य माणसांसाठी केलेले कार्य सोप्या भाषेत उलगडून दाखवते. या पुस्तिकेच्या पाचेक लाख प्रती तरी आतार्पयत विकल्या गेल्या असतील. या पुस्तिकेसंदर्भात एक गंमतीशीर घटनाही घडली होती. पुस्तक न वाचता केवळ नावावरून गोंधळ घालणाऱ्यांची आपल्याकडे कमतरता नाही; तसेच, या पुस्तकाबाबत घडले. नावामध्ये शिवाजी महाराजांना एकेरी संबोधण्यामागे अण्णांची काहीएक भूमिका आहे. परंतु त्यावरून कुणीतरी कथित शिवप्रेमींने पोलिसांमध्ये तक्रार केली आणि पोलिस अधिकाऱ्यांनीही या पुस्तिकेच्या प्रती जप्त करून आपल्या अगाध ज्ञानाचे दर्शन घडवले होते. आतासुद्धा शिवसेना आणि मनसेचे काही कार्यकर्ते या पुस्तिकेच्या नावावरून आपल्या अज्ञानाचं प्रदर्शन करीत असतात.

**एकदा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठात आंदोलन करताना, कुलगुरूंच्यासमोर जरा जास्तीच आगाऊपणा केला होता. त्याविरोधात कोल्हापूर शहरात तीव्र प्रतिक्रिया उमटत होत्या आणि अर्थात त्याला राजकीय रंग होता. पानसरेअण्णांसारख्या डाव्या पक्षाच्या नेत्यासाठी तर अभाविपवर टीका करण्याची ही मोठी संधी होती. परंतु, आयुष्यभर रस्त्यावरच्या लढाया करणाऱ्या अण्णांनी राजकीय भूमिका बाजूला ठेवून वेगळी भूमिका घेतली. ते म्हणाले होते, ‘आंदोलनाच्या जोशात कधीतरी असे घडून जाते. ते विसरून जायचे असते. मीही मागे एकदा तर्कतीर्थांच्या गळ्यात मेलेला साप घातला होता. माझी ती कृती चुकीची होती, हे आता माझ्याही लक्षात येते; परंतु, त्या त्या वेळी असे काहीतरी घडून जाते.’**

पानसरेअण्णा नेहमी शाहू महाराजांच्या परंपरेचा उल्लेख करायचे. कोल्हापूरची ती परंपरा पुढे चालवली पाहिजे, यासाठी सतत काहीतरी करत राहायचे. त्यांच्या या चळवळ्या स्वभावामुळेच कोल्हापूर शहराचा जिवंतपणा टिकून राहिला. तिथल्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनात सतत काहीतरी घडत राहिलं. शाहू महाराजांबद्दल त्यांना कमालीची कृतज्ञता वाटत होती. या कृतज्ञतेपोटीच त्यांनी ‘शाहू महाराज–वसा आणि वारसा’ नावाची छोटीशी पुस्तिका लिहिली, जी शाहूंच्या कार्याची नेमकी ओळख करून देते.

राजर्षी शाहूंच्या नगरीत आयुष्य व्यतीत करणारे अण्णा शाहूंच्या विचारांचे पाईक आणि कृतीशील अनुयायी आहेत. पानसरे म्हणजे नेमके कुठल्या जातीचे, याचे कोडे अनेकांना उलगडत नसे. जाती–पातींच्या पलीकडे जाऊन ते रस्त्यावरच्या माणसांसाठी. कष्टकऱ्यांसाठी लढाया करतात. त्यात रंगारुपानेही ओबडधोबड. मराठा समाजातला माणूस असे काही करणे शक्य नाही, त्यामुळे ते दलित आहेत, धनगर समाजाचे आहेत, असे अनेकजण छातीठोकपणे सांगत. शाहू महाराजांनी आपल्या बहिणीचा होळकरांच्या कुटुंबात विवाह करून आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले. आजच्या काळात शेजारच्या घरी शिवाजी जन्माला यावा, अशी मानसिकता असताना पानसरे यांनी, आपल्या दोन्ही मुलींचे आंतरजातीय विवाह आनंदाने स्वीकारले. त्यांचे सगळे कुटुंब चळवळीत सक्रीय राहिले.

**डाव्या चळवळीतल्या नेत्यांच्या एकूण व्यवहारातील रुक्षपणा पानसरेअण्णांच्याकडे नव्हता. जगण्यातले आनंदाचे क्षण छानपैकी साजरे करावेत, अशी धारणा असलेले ते कम्युनिस्ट होते. अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन, हा असाच एक त्यांनी सुरू केलेला वेगळा उपक्रम आहे. तो सुरू करताना त्यांचा निश्चित असा एक विचार होता. अण्णाभाऊ साठे यांच्यासारख्या शाहिराला, साहित्यिकाला एका जातीपुरते मर्यादित केले जाते, हे पाहिल्यानंतर त्यांनी अण्णाभाऊंच्या नावाने जागर सुरू केला. साहित्य संमेलन सुरू करण्याच्या खूप आधीपासून अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त शाहिरी पोवाड्यांची स्पर्धा सुरू केली. त्यानिमित्ताने अठरापगड जातीच्या शाहिरांना अण्णाभाऊ साठे या शाहिराची नव्याने ओळख करून दिली. स्वत: अनेक चांगल्या गोष्टी उभ्या केल्याच; परंतु, जिथे जिथे काही चांगले उभे राहतेय, तिथे तिथे ते समर्थनासाठी उभे राहिले आणि जिथे काही चुकीचे घडतेय त्याविरोधातही ठामपणे उभे राहताना त्यांनी कधी परिणामांची तमा बाळगली नाही. त्यासाठीची किंमत मोजली.**

पानसरेअण्णांची वाटचाल पाहिली की, एक खंत सतत वाटत राहते; ती म्हणजे, त्यांच्यासारख्या नेत्याला विधिमंडळात जाण्याची संधी मिळाली नाही. कोल्हापूरमधून त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवली. त्यासाठी चांगली तयारीही केली होती. परंतु, त्यामध्ये यश आले नाही. पानसरेअण्णांचा पक्ष असा की, विधानपरिषदेसाठी कोणत्याही पातळीवरचे संख्याबळ त्यांच्याबाजूने कधीच नव्हते. ते विधिमंडळात गेले नाहीत, त्यामुळे त्यांचे काही नुकसान झाले असे वाटत नाही. नुकसान झालेच असेल तर, ते विधिमंडळाचे झाले, असे म्हणता येईल. त्यांच्यासारखा कष्टकऱ्यांचा नेता, प्रभावी वक्ता विधिमंडळात गेला असता तर, कष्टकऱ्यांचे अनेक प्रश्न त्यांनी धसास लावले असतेच; परंतु, त्याचबरोबर त्यांच्यासोबत विधिमंडळात काम करणाऱ्या सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींचेही शिक्षण झाले असते.

डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि पानसरेअण्णा हे दोघेही संस्थात्मक जीवन जगत होते. दोघांकडेही कार्यकर्त्यांचे मोहोळ होते; परंतु, नेतृत्वाची सक्षम फळी नव्हती. दाभोलकर यांच्यानंतर पानसरे यांची हत्या का? याचे हेही एक कारण असू शकते. एखादी व्यक्ती संपवण्यापेक्षा संस्था संपवली तर, आपल्या हल्ल्याचा परिणाम अधिक खोलवर होऊ शकेल आणि आपल्याविरोधात उठणारा आवाज क्षीण होईल, असेही कदाचित हल्ला करणारांना वाटत असावे; परंतु, त्यांना हे माहीत नसावे की, गांधीजींना मारले म्हणून त्यांचा विचार संपला नाही. दाभोलकरांना मारले म्हणून जादूटोणा विधेयक लटकले नाही किंवा अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ थांबली नाही. पानसरेअण्णांवरील हल्ल्यामुळे पुरोगामी चळवळीला ब्रेक लागणार नाही.

दाभोलकर काय किंवा पानसरेअण्णा काय, व्यक्तिगत जीवनात ही अजातशत्रू माणसे होती. त्यांचे विरोधक होते ते वैचारिक पातळीवरचे. या वैचारिक विरोधकांची सहिष्णू म्हणून कधीच ख्याती नव्हती. त्यांना समाजात ज्या विषाची पेरणी करायची आहे, त्याची तीव्रता कमी करण्याचे काम दाभोलकर आणि पानसरेअण्णा करीत होते.

डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि पानसरेअण्णा हे दोघेही केवळ व्यक्ती नव्हते तर, संस्था म्हणूनच महाराष्ट्राच्या समाजकारणात वावरत होते. अंधश्रद्धा निर्मूलन समिती, साधना ट्रस्ट आणि एकूण समाजवादी चळवळ सोबत घेऊन दाभोलकरांची वाटचाल सुरू होती. पानसरेअण्णाही लोकवाङ्‌मयगृह, श्रमिक प्रतिष्ठान, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन, आम्ही भारतीय लोकआंदोलन अशा विविध संस्थांच्या माध्यमांतून कार्यरत होते. ते एकटेच कार्यरत नव्हते; तर, आपल्या विचाराच्या सगळ्यांना सोबत घेण्याचा, कार्यप्रवण करण्याचा प्रयत्न करीत होते. जातीयवादी शक्तिविरोधात सतत काहीतरी सुरू राहिले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. त्याअर्थाने पानसरेअण्णा अधिक व्यापक लढाई करीत होते. एकाचवेळी अनेक शत्रूंशी लढत होते. शत्रूपक्षाला चौकात उभे राहून आव्हान देत होते. डोंगराला भिडण्याची हिंमत दाखवत होते. ऐंशी वर्षे उलटून गेलेला एक माणूस इतक्या आघाड्यांवर काम करू शकतो, हे विस्मयचकित करणारे होते.

**लोक शहाणे झाले पाहिजेत. त्यांना चांगले आणि वाईट यातील फरक समजला पाहिजे, एवढीच त्यांची अपेक्षा होती आणि त्यासाठी त्यांचे काम सुरू आहे. वाईट काम करणाऱ्यांना त्यांचे हेच काम पसंत नव्हते, हे अलीकडे अनेकदा दिसून आले होते. म्हणूनच तर ज्यांनी दाभोलकरांना मारले त्यांनीच पानसरेअण्णांना मारले, असे म्हणता येते. दाभोलकरांच्यानंतर पानसरेअण्णांनाच का, याचेही उत्तर त्यातच मिळते.**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त पानसरे अण्णांनी कोल्हापुरात कम्युनिस्ट पक्षाच्या मित्रांचा मेळावा बोलावला होता. मंचावर त्यांच्यासह त्यांच्या पक्षाचे पदाधिकारी विराजमान होते. बहुतेक ज्येष्ठ मंडळी होती. त्यांच्याकडे निर्देश करून मी जाहीर भाषणात म्हणालो होतो, ‘तुमच्या नेत्या–कार्यकर्त्यांची निष्ठा, चारित्र्य आणि सत्तेची शक्यता नसताना, सतत सुरू असलेल्या लढाया याबद्दल आदरच आहे. परंतु अण्णा, तुमचा पक्ष म्हणजे वृद्धाश्रम बनलाय. तुमच्याकडे तरुण कार्यकर्त्यांना संधी नाही. तुमच्याकडे भगतसिंगासारखे मॉडेल असताना तुमची विद्यार्थी आणि युवक संघटना नीट कार्यरत नाही. तुमच्या कार्यकर्त्यांना नीट पत्रके लिहिता येत नाहीत, प्रसिद्धीमाध्यमांकडे वेळेवर पोहोचवता येत नाहीत. पक्ष कसा वाढणार ?’ वगैरे वगैरे.

जाहीरपणे कटू बोलण्याचा संस्कार खरेतर माझ्यासारख्याने पानसरे अण्णांकडूनच घेतला होता. मेळावा संपल्यानंतर ते म्हणाले होते, ‘तू आमच्या नेमक्या बाबींवर बोट ठेवलेस. आम्ही दुरुस्तीचा प्रयत्न करू’

एवढा मनाचा मोठेपणा पानसरे अण्णाच दाखवू शकतात.

(पानसरे अण्णांना जाऊन अकरा वर्षे झाली. त्यांच्यासंदर्भातील हा पूर्वप्रसिद्ध लेख)

***...विजय चोरमारे***

कोणी म्हणतंय राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करू,

कोणी म्हणतंय राहुल गांधी पुन्हा कधीच निवडणूक लढवू शकणार नाहीत अशी व्यवस्था करू,

कोणी राहुल गांधींवर विशेषाधिकार हनन प्रस्ताव आणण्याची धमकी देतंय,

कोणाला राहुल गांधी हा देशासमोरील सर्वात मोठा धोका वाटतोय,

राहूल गांधीचे विदेशी शक्तीशी संबंध असल्याचा साक्षात्कार काहींना होतोय,

काहींना राहुल गांधी देशाला कमजोर करीत आहेत असे वाटतंय,

काहींनी राहूल गांधी देशद्रोही असल्याचा आरोप करीत आपली मळमळ व्यक्त केलीय

आणि हे सारं कमी होतं म्हणून की काय

आज राजसिंह अमेरा या माथेफिरूनं राहुल गांधी यांना घरात घुसून गोळ्या घालण्याची धमकी दिलीय..

भाजपची सारी इको सिस्टम हात धुवून एकाच व्यक्तींच्या मागं लागलीय, त्याचं नाव आहे राहूल गांधी..

का घाबरताहेत हे सारे राहुल गांधी यांना ?

सर्वात आधी गोळ्या घालण्याची धमकी देणाऱ्या राजसिंह अमेराची चर्चा करू..

तो म्हणतो, 'राहुल गांधी आणि त्यांच्या खासदारांनी ओम बिर्ला यांचा अवमान केला.. पुन्हा असं झालं तर राहुल गांधी यांच्या घरात घुसून गोळ्या घालू' ..

राजस्थानमधील कोटा हा ओम बिर्ला यांचा मतदारसंघ हा अमेरा देखील कोटाचा ..

ओम बिर्लांचा जवळचा कार्यकर्ता ..

राहुल गांधी यांनी, ओम बिर्ला यांच्यावर अविश्वास प्रस्ताव आणल्यामुळे त्यांचं लोकसभेत येणं बंद झालंय.. त्यातून ही चिडचीड...

या अमेराला पोलिसांनी ताब्यात घेतलंय,

पण होणार काहीच नाही..

किरण रिजिजू,

शिवराज सिंह चौव्हाण

निशिकांत दुबे,

अमित शहा



ही सारी पलटण राहुल गांधी यांच्या मागे का लागलीय?

राहुल गांधी यांनी

जेफ्री एपस्टीनचा विषय संसदेत काढला,

राष्ट्रहित डोळ्याआड करून अमेरिकेबरोबर व्यापार करार केला गेला त्याची चिरफाड केली,

जनरल नरवणे यांच्या पुस्तकावरून सरकारच्या नाकीदम आणला,

अमेरिकेला घाबरून रशियाकडून तेल खरेदी कशी बंद केली यावर भाष्य केलं,

अदानी यांना वाचविण्यासाठी नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेपुढे कशी शरणागती पत्करली हे उघड केलं,

हरदीप पुरी या मंत्र्यांने २०१४ मध्ये एकाच वर्षात १४ वेळा एपस्टीन याची भेट घेतली हे निदर्शनास आणून दिलं,

हरदीप पुरी एपस्टीनला का भेटले असा सवाल केला?

हे सारे विषय, प्रश्न भाजपला निरुत्तर करणारे,

नरेंद्र मोदी यांना अडचणीत आणणारे असल्याने, भाजपचे सर्व नेते राहुल गांधी यांच्यावर तुटून पडलेत..

आता मजल राहुल गांधी यांना गोळ्या घालण्याची धम की देण्यापर्यंत गेलीय..

गोदी मिडिया शांत आहे,

समजा, अशी धमकी कोणी नरेंद्र मोदी यांना दिली असती तर? मिडियानं देश डोक्यावर घेतला असता..

ते असो..

पण तुम्हाला काय वाटतं?

राहुल गांधी अशा धमक्या ना घाबरतील?

मला नाही वाटत..

संसदेचं अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यानंतर राहुल गांधी नवनवे धमाके करीत राहतील हे वेगळं सांगायला नको..

प्रश्न विचारणं हे विरोधी पक्षाचं काम ..

अडचण अशी की, सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारलेलं आवडत नाही.. कारण, त्यांना अनेक गोष्टी लपवायच्या असतात..

त्यातून हा तणाव ..

पण आज तरी असं दिसतंय,

एक अकेला राहुल गांधी सबपर भारी हो रहा है!

एक समर्थ, निडर, बेधडक मांडणी करणारा विरोधी पक्ष नेता देशाला मिळाला असल्यानं सत्ताधाऱ्यांची कोंडी होत असून, पंतप्रधानांना सभागृहात येण्याचीदेखील हिंमत राहिली नाही..

**– एस.एम.देशमुख**

# कुत्र्या^(च्या मालका) पासून सावध रहा!

आम्ही लहानपणी एखाद्या बंगल्याच्या गेटवर लावलेल्या पाटीवर खडूने बदल करायचो. आम्हीच नाही, अनेक मुलं तसं करायची.

'कुत्र्या पासून सावध राहा' च्या जागी ^ अशी खूण करून

'कुत्र्याच्या मालका पासून सावध राहा' असं करायचो. त्याची आता फार आठवण येते आहे.

चर्चा होणारच. म्हणजे, या आणखी एका नॉनबायो अवताराला कोणी निर्माण केलं, त्याला गुप्तपणे कोणी आयात केला, आपणच कसा त्याला जन्म दिला, असं कोण कोण म्हणत आहे यावर चर्चा होणारच.

पण यापेक्षा हा AI चा पाळीव रोबो कुत्रा ('कुत्रोबो') कोणाच्या मालकीचा असणार आणि त्याची वागणूक कशी असणार हे नीट कळायला हवं आहे. त्यावर आपण सामान्य लोकांनी त्याचं कौतुक करावं की नाही, करावं तर किती करावं आणि त्यापासून सावध राहावं की नाही आणि सावध राहायचं तर किती सावध राहावं हे ठरेल.

त्याचा एतद्देशीय खाजगी मालक, हा परदेशी कुत्रोबो नुसता नाचवत असेल, उड्या मारवत असेल, पुढच्या पायावर उलटा चालवत असेल, शेक हॅन्ड करवत असेल, तोवर ठीक आहे..दोन दिवस मजाही आली पाहायला..

पण नंतर, संधी मिळेल तसा तो त्याला जनतेच्या अंगावर छू ऽ म्हणून घालणार असेल तर, आपण जपून राहायला हवं. (आणि जनता म्हणजे आपण भिकारी नाही आहोत ) हेही त्या मालकाला निक्षून सांगावं लागेल.

आज त्याचा खाजगी मालक, त्याची जगभरात लाज गेल्याने तोंड लपवून बंगल्यात चुपचाप बसला आहे तोवरच, हे आपण करायला हवं आहे.

(सर्वच खाजगी तंत्रज्ञान हे आज खाजगी मालकाच्या आधीन असतं. ते कधी भुंकेल, चावेल सांगता येत नाही. त्याला आपल्या; म्हणजे, सामान्य लोकांच्या बाजूने भुंकायला लावलं पाहिजे. वेळ आली तर चावायला सुद्धा.. पण ही पुढची गोष्ट )

**– मोहन देस**


# कंड्या पिकवणारा बंड्या....

बंड्याने शाळेत असताना एकदा 'रोबो' (Robot) बनवलेला...त्याला मेडल पण मिळालेलं... आमचा बंड्या लै हुश्शार, बरं का! त्याचंच पेटंट गॅलगोतियाने वापरलं आणि कुत्रा बनवला...बंड्या त्याच्या गळ्यात पट्टा अडकवून 'AI Summit' मध्ये मिरवायला लागला...भाषण करताना आणि विचार मांडताना डोक्यात कांदे भरलेले, म्हणून तो AI ची मदत घेता झाला.

बंड्या, खरंतरं एव्हढा हुशार होता की, शिक्षकांनी त्याला सांगितले की, तू सातवीच्या पुढे शिकूच नकोस बाळा...तू आपला शाळा सोडून जाऊच नकोस. पण बंड्याच तो, तो कसला ऐकतो...त्याने शिक्षकांचे काहीही ऐकले नाही. तो सरळ गटारात पाईप टाकून गॅसच्या शेगडीवर चहा बनवायला लागला...आणि, स्टेशन अस्तित्वात यायच्या आधीच, GDPची आकडेवारी दामदुप्पट फुगवण्यासारखी एकदम 'जादू' करुन, किटलीतून चहा स्टेशनवर (अदृश्य असलेल्या) विकूही लागला. त्यानंतर त्याला अंतराळ संशोधन करायची अनावर सुरसुरी आली...बांगलादेशावर जेव्हा पाकिस्तान फारच अन्याय-अत्याचार करु लागला; तेव्हा, बांगलादेशाच्या मदतीला बंड्या गेला...बरं, हे सगळं केल्यावर भारताला २०१४ साली स्वातंत्र्य बहाल करायलाही तो विसरला नाहीच! अशा अनेक उचापती करता करता, त्याने गुजराथ (मेहसाणा-वडनगर) येथून हनुमानासारखं उड्डाण करत थेट दिल्ली गाठली...आणि, एक चमत्कार पुन्हा घडला. बंड्याने दिल्ली-विद्यापीठातून MA ची डिग्री घेतली आणि मगच तो BA झाला...

पुढे जपजाप्य करत राहिला, 'हर हर गंगे, नमामि गंगे' आणि दुसरीकडे, गंगेसाठी प्राणार्पण करणाऱ्या जातिवंत साधुसंतांचे प्राण घेत राहिला!

**मराठी भाषेत आपण सहज वापरतो**
**स्वल्पविराम, पूर्णविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारचिन्हः**
**या विरामचिन्हांची शिस्तबद्ध सुरुवात एका ब्रिटिश अधिकाऱ्याने केली! ते डेक्कन कॉलेज पुणेचे प्राचार्य सुद्धा होते. त्यांचे नाव 'मेजर जेम्स थॉमस कँडी'**



१८व्या-१९व्या शतकात मराठी लेखन सलग असायचे.
दंड (।) आणि द्विदंड (।।) एवढीच चिन्हे वापरली जात.
इंग्रजी भाषेच्या प्रभावानंतर पुढील चिन्हे मराठीत रूढ झाली:
स्वल्पविराम (,)अर्धविराम (;)
पूर्णविराम (.) प्रश्नचिन्ह (?)
उद्गारचिन्ह (!) इत्यादी
मात्र कँडी यांनी १८५० साली 'विरामचिन्हांची परिभाषा' ही पुस्तिका लिहून
मराठी लेखनाला नवा श्वास दिला.
वाक्याचा अर्थ स्पष्ट व्हावा, वाचन सुलभ व्हावे,
आणि लेखनाला शिस्त लाभावी, यासाठी त्यांनी नियम तयार केले.
आज आपण लिहितो त्या प्रत्येक वाक्यात
कँडींचा अदृश्य स्पर्श आहे!
'विरामचिन्हांची परिभाषा' ही १६ पानी पुस्तिकाच त्यांनी लिहीली, मराठी-इंग्लिश शब्दकोश निर्मितीमधे त्यांचे अमुल्य योगदान आहे
२६ फेब्रुवारी रोजी त्यांचे १५० वे स्मृतिवर्ष होते.
मराठी लेखन समृद्ध करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाला विनम्र अभिवादन.

# भीषण आगीतून मुंबईकरांना वाचवणारे पाण्याचे नळखांब (Fire Hydrant) गायब.

भीषण आग विझविण्यासाठी पाण्याची तात्काळ आवश्यकता भासते. मुंबईकरांच्या जीवीताची व त्यांच्या मालमत्तेची काळजी घेऊन ब्रिटीशनी अग्निशामक नळखांबांची (**FIRE HYDRANT**) व्यवस्था मुंबई शहरात जागोजागी केली होती. जेणेकरुन शहरात कुठेही भीषण आग लागल्यास अग्निशामक नळखांबांद्वारे पाण्याचा पुरवठा तात्काळ उपलब्ध होऊन लागलेली भीषण आग तात्काळ विझवता येणे शक्य होईल.

मात्र, आज अशा अत्यावश्यक सेवेसाठी असणाऱ्या अग्निशामक नळखांबांची अवस्था दयनीय असून अनेक अग्निशामक नळखांब अकार्यक्षम झालेले असून; काही नळखांब तर, भूमीगत झाल्याचे समजते.

ब्रिटीशांनी उभारलेल्या अग्निशामक नळखांबांचे नियोजन व परिरक्षण मुंबई महानगरपालिकेच्या जल अभियंता यांच्या अखत्यारीतील बांधकाम खात्याचे आहे. तसेच, अग्निशमन विभागाने स्थळ निरिक्षण करुन तसा अहवाल देणे अभिप्रेत आहे. पण, याबाबत आपले सर्व राजकीय नेते व त्यांचे कार्यसम्राट नगरसेवक मूग गिळून गप्प आहेत.

मुंबई शहर तसेच, पूर्व-पश्चिम उपनगरातील अस्तव्यस्त तसेच कोलमडलेली वाहतूक व्यवस्था पाहता, भीषण आग लागलेल्या ठिकाणी अग्निशामक दलाचे पाण्याचे टँकर व बंब वेळेवर पोहोचणे अशक्य असल्याने तात्काळ पर्याय म्हणून या अग्निशामक नळखांबांचा उपयोग होतो.

८०,००० कोटींचा सर्वाधिक अर्थसंकल्प असलेल्या, मुंबई महानगरपालिकेतील सत्ताधारी व पहारेकरी मात्र, नागरिकांच्या जीवीताच्या व मालमत्तेच्या संरक्षणासाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. विशेष म्हणजे, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम-२६६ अन्वये जागोजागी अग्निशामक नळखांबांची उभारणी करण्याची तरतूद असतानाही, सत्ताधारी व पहारेकरी अर्थकारणातच मग्न असल्याने सर्वसामान्य मुंबईकरांचा आगीत होरपळून कोळसा होण्याची वाट पाहत आहेत.

***शरद यादव,***
माहितीचा अधिकार कार्यकर्ता व प्रशासकीय कामकांज सल्लागार.



# Trade-Deal by 'compromised' Prime Minister... ...पृष्ठ क्र. १ वरुन

दिसतंय...पण, मलेरियाचे जंतू, जसे आपल्या यकृतात दबा धरुन बसलेले असतात; तशाच, या सगळ्या ट्रम्पकृत अटीशर्ती, दबा धरलेल्या स्थितीत असून कुठल्याही कमजोर क्षणी, त्या पुन्हा कार्यान्वित होतीलच. भारतात केवळ अमेरिकन शेतमालावर आयात-करच जास्त होता, असं नव्हे; तर, अमेरिकेतील मका आणि सोयाबीन, ही पिके जनुकीय-परावर्तित (GM) असल्याने भारतात आयात करण्यास त्याला बंदी होती (भारतात जेव्हा, सोयाबीनचे दर अस्मानाला भिडले होते; तेव्हा, प्रासंगिक उपाययोजना म्हणून केवळ, त्याची आयात केली गेली; तेव्हा, सोयाबीनचे दर फटक्यात एकतृतीयांश खाली आले आणि सोयाबीन पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या)...तसेच, मोठ्या आयातकरासह मांसाहारी पदार्थ अन्नाद्वारे दिले 'न' जाणाऱ्या जनावरांचंच दूध विकण्याची भारतात परवानगी होती...अमेरिकेत दुधाळ जनावरांचं अधिक प्रोटिनयुक्त दूध मिळावं, म्हणून त्यांच्या चार्यात मोठ्याप्रमाणावर कृत्रिमरित्या प्रजनन केलेले विशिष्ट कीटक मारुन टाकले जातात.

अमेरिकेतून-न्यूझीलंडमधून सफरचंद येणार, इतर शेतमाल येणारच; बाकी दुग्धजन्य पदार्थ येणार (सध्यातरी, आम्ही द्रवरुप दूध आयात करणार नाही, असं 'फेकू' सरकार म्हणतंय), कारण, हे शेटजी-भटजींचं भाजप-संघीय सरकार, भांडवलदारांचं कायमच उघड उघड 'बटीक' होतं व आहे, त्यांचीच 'दलाली' करण्याचं, त्यांचं आजवरचं राजकीय 'भांडवली-सूत्र' आणि 'भांडवली-चारित्र्य' राहिलेलं आहे; याचा अर्थ, तो तेवढा आयात अमेरिकन-माल, भारतीय बाजारपेठेतील स्थानिक भारतीय-शेतकऱ्यांना तेवढ्या प्रमाणात उध्वस्त करत जाणार...जसे 'ब्रिटीश तयार माला'ने गावोगावचे लाखो भारतीय यंत्रमाग बंद पडले व ब्रिटीश-वसाहतवादाचं भारतात यशस्वी रोपण झालं; तोच काळा-इतिहास पुन्हा नव्याने लिहीला जाणार आहे. तेव्हाही, या भाजप-संघीयांचे पूर्वसुरी ब्रिटीश-सरकारची तळी उचलत होते; आता, अमेरिकन-सरकारची उचलतील!

## "भारताच्या 'सार्वभौमत्वा'चा नंतर 'बळी' जाईल...प्रथम, 'स्वयंपूर्णते'चा जाईल!"

...लक्षात घ्या, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने हजारो एकरची शेती कसणाऱ्या अमेरिकन शेतकऱ्यांवर एकूण कर्ज ६०० अब्ज डॉलर्सहून अधिक आहे; आणि म्हणूनच, राष्ट्रीय-सरासरीपेक्षा तेथील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं प्रमाण साडेतीन ते चार पट जास्त आहे. "आपला शेतमाल आता भारतात 'निर्बंधमुक्त निर्यात' होणार", यामुळे तेथील शेतकरी 'फासाचे दोर' दूर सारुन शॅंपेनच्या पार्ट्या करु लागलेत...अमेरिकन शेतमालासोबतच, तिकडे आता बिनकामाचे झालेले 'फासाचे दोर', भारतात आयात होतील व भारतीय शेतकऱ्यांच्या बांधावर विसावतील!

"अमेरिका, हा फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये रहाणारा; पण, प्रत्यक्षात 'भिकारी' असलेला देश आहे", असं एक नामवंत अर्थतज्ज्ञ काही वर्षांपूर्वी बोलून गेला होता किंवा 'Democracy At Work'चे 'रिचर्ड वोल्फ' सातत्याने सांगत असतात की, 'American Empire Is Dying!" कारण, आजच्या घडीला अमेरिकन राष्ट्रीय-कर्ज, हे ३९ ट्रिल्यन डॉलर्स; म्हणजे, त्याच्या 'GDP'पेक्षा (३१ ट्रिल्यन डॉलर्स) कितीतरी जास्त आहे. आफ्रिकन देशांचा कर्जाच्या सापळ्यात अडकून श्वास गुदमरतो; पण, अमेरिकेचं तसं का होतं नसावं...याचं कारण, अमेरिकन डॉलर, हे सध्याचं आंतरराष्ट्रीय-चलन असल्याने, निव्वळ अधिकच्या नोटा छापून (१९७०-७१मध्ये अमेरिकेने डॉलर आणि सोन्याचा अर्थाअर्थी संबंध संपुष्टात आणला, म्हणूनच) अमेरिका आपल्या कर्जाची सव्याज परतफेड करु शकते. बरं, आफ्रिकन किंवा अन्य देश अन्नपदार्थांच्या बाबतीत 'स्वयंपूर्ण' होत, कर्जाच्या सापळ्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्नही करु शकत नाहीत. आफ्रिकन देशांनी त्यांच्या भौगोलिक स्थितीला अनुसरुनच इतरत्र न होऊ शकणारी पिके घ्यायची व ती कर्जफेडीच्या बदल्यात अमेरिकेला व अन्यत्र निर्यात करायची (उदा. आफ्रिकन कोको-उत्पादने). मात्र, यात काहीही गडबड केल्यास, संबंधित राष्ट्रावर निर्बंध लादून अमेरिका अन्नधान्याच्या पुरवठ्याविना उपासमारीद्वारे त्यांना जेरीस आणू शकते! वाचकहो, वरील अमेरिकन-षडयंत्री 'स्क्रिप्ट'चे धागेदोरे, तुम्हाला होऊ घातलेल्या 'American Trade-Deal'मध्ये कुठे दिसतायत का...जरा, "उघडा डोळे, बघा नीट"!

तेव्हा, बुडत्या अमेरिकन साम्राज्याच्या नौकेला वाचवण्यासाठी चाललेल्या ट्रम्प यांच्या केविलवाण्या धडपडीत...गौतम अदानीचा गुन्हेगारी दावा आणि एपस्टिन-फाईल्सचे दोन भक्कम 'नांगर', 'विनापरवाना'च (पंतप्रधानच 'Compromised', मग काय?) भारतीय बंदरांमध्ये खुशाल टाकून, बुडत्या अमेरिकन-अर्थव्यवस्थेला 'भारतीय-काडी'चा आधार देण्याचा प्रयत्न होत असल्यानेच...'राहुल गांधी' नावाचा 'ढाण्या वाघ' संसदेत व संसदेबाहेर गुरगरतोय, तो देश विकायला निघालेल्या, भाजप-संघीयांच्या तावडीतून देश वाचवण्यासाठीच!

बलात्कारी, विक्षिप्त-विकृत हुकूमशहा असलेले अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, यांनी बराक ओबामा यांच्या कारकीर्दीतील "पर्यावरणासंबंधी नियमांचा (Based on Environmental Protection Agency's 2009 "Endangerment findings") 'कायदेशीर पाया' एका आदेशाने नुकताच उखडून टाकला आहे!

दुर्दैव आहे, या जगाचं आणि त्याहीपेक्षा, पुढल्या पिढ्यापिढ्यांचं...की, पर्यावरणीय स्थिती कमालीची बिघडली असताना व परिस्थितीचं गांभीर्य 'पॉईन्ट ऑफ नो रिटर्न'पर्यंत पोहोचत असताना...भारतासह अमेरिका, रशिया, चीन या बड्या देशांचे 'राष्ट्रप्रमुख', हे हुकूमशाही वृत्तीचे असावेत आणि त्यांच्यासाठी "तेल, सिमेंट, लोखंड यांचा दरडोई वाढता खप व कॉर्पोरेटीय क्षेत्राचे बेफाम फुगणारे नफे"; म्हणजेच, केवळ 'विकास' असावा.

...हा केवळ, फार मोठा दैवदुर्विलासच नव्हे; तर, या अज्ञ-अहंमन्य राष्ट्रप्रमुखांची, पर्यावरणाविषयी अशी भयंकर बेपर्वा वृत्ती...पुढील पिढ्यांच्या पुढ्यात, खचितच 'अंधाराचं ताट' वाढून ठेवेल!

**"In order to become responsive to science and responsible to society"....**
**जयराम रमेश (तत्कालीन केंद्रीय पर्यावरण व वन मंत्री)**

'ICAR'च्या (The Indian Council of Agricultural Research) शास्त्रज्ञांसाठी 'गॅग-ऑर्डर' Gag जीवशी) काढण्यात आलेली असून 'GM अन्नपदार्थ' सेवनाच्या संभाव्य धोक्यांविषयी; ते जणू भाजपचे मंत्री, पदाधिकारी, संसद-विधिमंडळ सदस्य असल्यासारखे, 'मोदी-शाह' संयुक्त-दहशतीमुळे ब्र देखील आता काढू शकणार नाहीत! याच संस्थेच्या शास्त्रज्ञांनी व इतरे तज्ज्ञांनी 'जनुकीय-परावर्तित (GM)' अन्नपदार्थांना, मानवी-आरोग्याच्या दृष्टीकोनातून सप्रमाण तीव्र विरोध दर्शवताच...जयराम रमेशांनी जगजीवनरामांप्रमाणेच अमेरिकन दबावाची 'ऐशीतैशी' करत, त्याला वरीलप्रमाणे तत्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला होता. GM अन्नपदार्थांना कॉंग्रेसमध्येच मोठा अंतर्गत विरोध झाला होता, असं नव्हे; तर, भाजपच्या राज्य-सरकारांनीही (तसेच, त्यांच्या 'स्वदेशी-जनजागरण' संस्थेनं) व पुढे अटलजींच्या केंद्र-सरकारनेही त्यांना कडवा विरोध केला होता.

अमेरिकेत ५५% GM-शेतमाल पिकवला जातो; पण, तो देशांतर्गत बाजारपेठेत पूर्ण विकला जाऊ शकत नाही. अमेरिकन दबावापुढे झुकत, अंदाजे फक्त ३५ देशच GM अन्नपदार्थ खातात; मात्र, मानवी-आरोग्याला असलेला धोका ओळखून युरोपियन देशांसह बाकी कुणीही खात नाही. म्हणूनच भारतात जेव्हा जेव्हा कधि कुठे वांगी, सोयाबीन वगैरेंची छुप्या पद्धतीने केलेली 'GM' शेती आढळलीय, तेव्हा तेव्हा उभी पिकं जाळून टाकण्यात आलेली आहेत. आजच भारत देश, मधुमेह व हृदयविकाराची 'जागतिक-राजधानी' बनलाय...त्यात, आम्ही GM अन्नपदार्थ सेवनाच्या माध्यमातून अनंत मरणांची भर घालणार आहोत काय? लक्षात ठेवा, अमेरिकेतला उच्चभ्रूवर्ग (Elites), GM अन्नपदार्थांचं 'सेवन' तर सोडाच; त्याच्या आजुबाजुलाही फिरकत नाही (जसे, आपल्याकडे अमिताभ, सचिन, अंबानी वगैरे मंडळी रसायनमुक्त 'नैसर्गिक-शेती'तीलच खाद्यान्न, फळे, भाज्या व दुग्धजन्य पदार्थ खातात).

...म्हणे, GM-सोयाबीन नव्हे; तर, सोयाबीन-तेल अमेरिकेतून आयात करणार; त्यात, GM-अन्नांश नसतील? भारतात आपण कापसाचं 'बिटी कॉटन' हे GM-बियाणं वापरतो...जरी कापूस वस्त्रोद्योगात वापरला जात असला; तरी, सरकीच्या तेलातून (कापसाच्या बियांपासूनच वनस्पतिजन्य तेल) GM-अन्नांश, अन्नसाखळीत सहजी प्रवेश करु शकतातच!

'गौतम अदानी गुन्हेगारी दावा आणि एपस्टिन-फाईल्स'मुळे, भारत हा ट्रम्प यांचा हातात आयताच 'बकरा' सापडलाय... "कोणी कसा, कुठे कापत त्याचे लचके तोडायचे आणि खायचे", याची 'हॉलिवूड-टाईप स्क्रिप्ट' लिहिण्यात, 'व्हाईट-हाऊस'मधले अंतःकरणाने 'काळेकुट्ट' असलेले गोरे लोक, सध्या मग्न आहेत!

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**